# माणूस

शनिवार । २ डिसेंबर १९७८ । ७५ पैसे


### राष्ट्रपतींची भेट

## अमरावतीच्या छात्रयुवांचा आक्रोश

आदरणीय राष्ट्रपती महोदय,

अमरावतीकर नागरिकांसोबत आम्हीही आपले स्वागत करतो; पण ह्या स्वागताला दुःखाची छटाही आहे. खरोखरच आमचा आमच्या कानांवरील व डोळ्यांवरील विश्वासच उडाला आहे. जनता पक्षाची राजवट आल्यावर राजघाटावर महात्माजींना स्मरून आपण काही शपथा घेतल्या होत्या. १४ ऑगस्ट १९७७ च्या रेडिओवरील भाषणात आपण राष्ट्रभवन सोडण्याचा, वेतन न घेण्याचा, साधेपणाने राहण्याचा व सरकारी श्रीमंती थाटाच्या खर्चाला आळा घालण्याचा निर्णय घेतला होता. आपल्या त्या भाषणाने आम्ही अक्षरशः भारावून गेलो होतो. प्रथमतः मनाला वाटले, राष्ट्रपित्याचे ध्येयधोरण सांगणारे व त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृती करणारे राष्ट्रपती म्हणून आपण आमच्या हृदयसिंहासनावर विराजमान झाला होता.

पण आज आम्हाला काही वेगळंच दिसत आहे. आपल्या स्वागतासाठी पाण्यासारखा होणारा खर्च पाहून आम्ही थक्क झालो आहोत. लाखो रुपयांची धुळधाण जनतेच्या पैशातून झाली आहे. अनेक सरकारी यंत्रणा आपल्या स्वागतासाठी रात्रंदिवस राबविल्या गेल्या आहेत. अमरावती शहराला लष्करी छावणीचे स्वरूप आपल्या स्वागतानिमित्त आलेले आहे.

आम्ही खरोखरच मूर्ख आहोत. नेत्यांनी दिलेली आश्वासने, त्यांनी दिलेली भाषणे ही केवळ बोलण्यासाठी असतात, प्रत्यक्ष कृतीसाठी नसतात, ही साधी गोष्ट जर आम्हाला कळली असती तर असला हा वारेमाप खर्च का होतो वगैरे फालतू प्रश्न आमच्या डोक्यात उद्‌भवलाच नसता.

अमरावती नगरपरिषदेने आपल्या स्वागतासाठी काय जय्यत तयारी केली आहे ! आपल्या कार्यक्रमासाठी अंदाजे १८,००० रु. चा मंडपखर्च, प्रसिद्धीसाठी १५,००० रु., फोटोग्राफीवर २०,००० रु., आपल्या कार्यक्रमाच्या न्यूजरीलवरील खर्च ५००० रु.–हा खर्च तर नगरपरिषद करणारच आहे. त्याशिवाय केंद्रीय व राज्य प्रसिद्धि खातेही ह्यासाठी राबताहेत. आपण येणार त्या वेळी रोषणाई ही हवीच. त्यावर २०,००० रु. सारखा मामुली खर्च होत आहे. फटाक्या-शिवाय आपल्या स्वागताला रंगतच येणार नाही त्यासाठीही दोन-तीन हजारांची तरतूद आहेच. ह्याशिवाय ह्या कार्यक्रमांसाठी झालेला छपाई–खर्च ७,०००, टेलीफोन–खर्च १५,०००, सांस्कृतिक कार्यक्रमावरील खर्च २०,०००, तात्पुरत्या लावलेल्या मजुरांसाठी १०,००० रु. असा खर्च आहे. त्याशिवाय पोलिसयंत्रणा, S. R. P., बी. & सी. खाते, ह्या खात्यांचा खर्च किती असेल कोण जाणे !

हा सर्व खर्च का होतो आहे, असे फालतू प्रश्न आमच्या मनात उद्‌भवताहेत. आम्ही ऐकले होते ह्या देशात ६० टक्के लोक गरिबी-रेषेखाली जगतात; पण अमरावती शहरातील आपल्या स्वागताचा श्रीमंती थाट बघून कोण म्हणेल हा देश गरिबांचा आहे? आणि कोण विश्वास ठेवील की आपणही गरीब देशाचे राष्ट्रपती आहात म्हणून? हा आनंदसोहळा खरोखरच कशासाठी होतो आहे ? उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, हरियाना येथील लोकांची कुटुंबे पुराने उध्वस्त झाली म्हणून आम्ही हा आनंदोत्सव साजरा करतो आहोत? आम्हाला काहीच कळत नाही. खरोखरीच आम्ही मूर्ख आहोत !

जनतेचा पैसा वारेमाप खर्च तर केलाच; पण आपल्या जनतेच्याच पैशावर होणाऱ्या कार्यक्रमाला सर्वसामान्य लोकांना अटकाव-का ? ज्यांना निमंत्रणे असतील त्यांनाच प्रवेश का ? कामगारांनी काही मागण्या केल्यावर त्या पुरविण्यासाठी सरकारी तिजोऱ्यांमध्ये पैसा नाही; पण आपल्या स्वागतासाठी एक दिवसाला लाखो रुपये उधळणे शक्य आहे काय ? असल्या बेकार प्रश्नांनी आम्ही अस्वस्थ आहोत. बेचैन आहोत. आपण आमच्या ह्या पत्रांनी अस्वस्थ होण्याचे कारण नाही. गरीब देशाचे श्रीमंत राजे आहात आपण ! का बरे अस्वस्थ व्हाल ?

– काही मूर्ख सदस्य

# साप्ताहिक माणूस

**वर्ष अठरावे–अंक सत्ताविसावा**

२ डिसेंबर १९७८

**मूल्य ७५ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबावतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


# सप्रेम नमस्कार

□ १९।११।७८ रोजी अमरावती येथे राष्ट्रपती येणार होते. त्यानिमित्त अनेक कार्यक्रम अमरावती शहरात आयोजित केले गेले होते. अमरावती नगरपरिषदेच्या शताब्दिमहोत्सवानिमित्त त्यांचे आगमन झाले होते.

नगरपरिषदेने शताब्दिमहोत्सवानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये प्रचंड प्रमाणात पैसा खर्च केला. एकट्या राष्ट्रपतींच्या कार्यक्रमासाठी अंदाजे तीन-चार लाखांचा नगरपरिषदेचा खर्च झाला. मुखपृष्ठावरील पत्रकात ढोबळ मानाने आकडे दिले आहेत. त्यांमध्ये इतर अनेक बाबींवर झालेल्या खर्चाची नोंद नाही.

राष्ट्रपतींच्या आगमनापूर्वी दोन-तीन दिवस रोज रंगीत तालमी व्हायच्या. हेलीकॉप्टर रोज आकाशात घिरट्या घालायचे, वगैरे प्रकार चालू असायचे.

ह्या प्रकारांचा निषेध करण्यासाठी मुखपृष्ठावर छापलेले पत्रक राष्ट्रपतींची जाहीर सभा सुरू होण्याआधी ठिकठिकाणी वाटायला काही कार्यकर्त्यांनी सुरुवात केली. ही पत्रके वाटीत असताना ती पत्रके कार्यकर्त्यांच्या हातातून हिसकावून घेतली गेली व एका महिला कार्यकर्तीला अटक करण्यात आली. त्यानंतर ही पत्रके जनतेच्या हातातूनही वाचू न देता पोलीस हिसकावून घेत होते. ह्याबाबत कार्यकर्त्यांनी कारण विचारताच त्यांनाही अटक करण्यात आली. ५ कार्यकर्त्यांना ह्या प्रकरणी अटक केली गेली !

कोणत्या कारणासाठी अटक झाली ती कारणे सांगण्यात आली नाहीत. उलट कारण विचारणारांनाच अटक केली गेली. वरील घटनेचे कसल्याही प्रकारचे वृत्त कोणत्याही वृत्तपत्रात आले नाही.

शांततापूर्ण मार्गाने पत्रके वाटणे, त्याबाबत अटक केली जाणे, वृत्तपत्रात हे वृत्त न येणे हे सर्व प्रकार खेदजनक वाटतात. आणीबाणीविरुद्धच्या लढ्यातून निर्माण झालेल्या सरकारकडून ही अपेक्षा नव्हती.

**२० नोव्हेंबर** **चंद्रकांत वानखडे**
सहसंयोजक
छात्रयुवा संघर्षवाहिनी, महाराष्ट्र

□ माणूस दिवाळी १९७८ चा अंक पाहिला. त्यात विचारप्रवर्तक लेख असल्यामुळे तो आवडला. ‘अलिगढ ते अखंड भारत’ हा लेख छानच जमला आहे.

एक वाचक म्हणून एका गोष्टीकडे लक्ष वेधावेसे वाटते ‘गोहर आणि गंधर्व : तीन मुलाखती’ या दादूमियांच्या लेखात पृ. ४२ वर ‘सयाजीराव १९३७ मध्ये वारले’ असे विधान आहे, तर पृ. ६२ वर ‘१९३९ साली सयाजीरावमहाराज एप्रिल महिन्यात गेले’ असे विधान आहे. यामुळे वाचकांच्या मनात संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. या दोन विधानांपैकी पहिल्या विधानातील १९३७ हे साल चूक आहे. दुसऱ्या विधानातील १९३९ हे साल मात्र बरोबर आहे. (आधार – गो. स. सरदेसाई – ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावली १९५७ पृ. २६). एकाच लेखातील एकाच व्यक्तीच्या मृत्यूच्या सालातील विसंगती मनाला खटकते, यात संशय नाही.

**७ नोव्हेंबर,** **र. वि. हेरवाडकर, मुंबई**

मुंबई वार्ता । विनय सहस्रबुद्धे

# जनताला भोवलेला घटकवाद

मुंबईचे पहिले जनता पक्षीय महापौर म्हणून श्री. राजा चिंबुलकर यांची निवड झाल्यामुळे बराच काळ लांबलेल्या महापालिका-निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. श्री. राजा चिंबुलकर हे एक सच्चे समाजवादी म्हणून ओळखले जातात. गेली सव्वीस वर्षे अत्यंत निष्ठेने आणि तळमळीने प्रजासमाजवादी पक्षाचे कार्य त्यांनी केलेले आहे. त्यांच्या उमरखाडी विभागात सहकारी व ग्राहक चळवळीतही त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे.

साहजिकच अशा केवळ नेत्याच्याच नव्हे तर एका खऱ्याखुऱ्या कार्यकर्त्याच्या निवडीमुळे जनता पक्षीय मंडळी समाधानात असतील तर आश्चर्य वाटू नये. महाराष्ट्रात एक रत्नागिरी जिल्हा सोडला तर या मुंबई शहरानेच गेल्या दोन्ही निवडणुकांत जनता पक्षाला हातचे काहीही न राखता भरभरून यश दिले आहे. मुंबई महापालिकेच्या गेल्या निवडणुकीत तेवढे भरीव जरी नाही तरी इतर पक्षांच्या तुलनेत बऱ्यापैकी यश जनता पक्षाने मिळविले आहे; पण निश्चितच हे यश फारसे समाधानकारक नाही. मित्रपक्षांच्या दबावाच्या राजकारणात जनता पक्षाची झालेली कुचंबणा, वॉर्ड कमिटयांच्या शिफारशी विचारात न घेता केलेली उमेदवारांची निवड व त्यामुळे बंडखोर उमेदवारांशी द्यावी लागलेली टक्कर, अमुक एक घटक-पक्ष नको या हट्टापायी अविचाराने दिली गेलेली तिकिटे, अतिशय निर्जीव आणि गतिशून्य प्रचारमोहीम आणि सगळयात महत्त्वाचे म्हणजे घटक-पक्षवादी भूमिकेतून नेत्यांच्या मानगुटीवर बसलेली तिकिट-वाटपाची 'कोटापद्धत' अशी अनेक कारणे जनता पक्षाचा प्रभाव कमी होण्यामागे आहेत.

जनता पक्षाची राष्ट्रीय प्रतिमा नेत्यांच्या भांडणामुळे धूसर बनत आहे, या गोष्टीचा मुंबईकर मतदारांवर परिणाम झाला नसेलच असे नाही; पण अखेर पालिका-निवडणूक ही मुख्यत्वे नागरी प्रश्नांवर लढविली जाते. स्वाभाविकच स्थानिक परिस्थितीशी संबंधित अशी जी कारणे जनता पक्षाच्या अपुऱ्या यशाला कारणीभूत आहेत त्यांचाच विचार मुख्यत्वे आवश्यक आहे.

या निवडणुकीत जनता पक्ष व मित्र पक्षांनी संयुक्तपणे मोर्चेबंदी केली. त्यात जनता पक्षाने १०२ जागा लढविल्या. अन्य मित्रपक्षांचा व त्यांच्या आणि जनता पक्षाच्या मुंबईतील कामाचा विचार करता जागांचे झालेले वाटप हे योग्य आहे, हे सामान्य कार्यकर्त्यांना पटण्यासारखे नव्हते. आधी काँग्रेसबरोबर राहून सत्ता उपभोगायची, नंतर जनताबरोबर युती करून अमुक एक जागांची हक्काने मागणी करायची, हे मित्र म्हणविणाऱ्या बऱ्याच पक्षांचे धोरण जनता पक्षाला महागात पडले. मित्रपक्षांपैकी शे. का. पक्षाने वेगळी चूल मांडली खरी; पण एकही पदार्थ न शिजल्यावर चूल थंड असल्याचे त्यांच्या लक्षात आले. एकूणच शे. का. पक्षाचे धोरण अधिकाधिक अडवणुकीकडे झुकत आहे. कुलाबा जिल्ह्यात ते जि. प. च्या निवडणुकीत काँग्रेस (आय) बरोबर युती करणार आहेत अशी बातमी आहे. जनता पक्षाला हे चालणार आहे का? मित्रपक्षांपैकी अन्य म्हणजे मार्क्सवादी कम्युनिस्ट, रिपब्लिकन इ ना त्यांच्या त्यांच्या वकूवाप्रमाणे जागा मिळाल्या आहेत. शरद पवार काँग्रेसचे बरेचसे उमेदवार, अर्ज भरण्यापूर्वी एक-दोन दिवसच त्या पक्षाची वस्त्रे मिरवीत होते या गटाला १४ जागा मिळाल्या. या निमित्ताने मुंबईत पाय रोवल्याची व युतीच्या राजकारणात आपली Bargaining Power वाढविण्याची मोठी संधी या पक्षाला मिळाली आहे. या power चे प्रत्यंतरही लगेचच महापौरपदाच्या निवडणुकीत, बाबूराव शेट्यांची उमेदवारी बराच काळ मागे घेतली गेली नाही, तेव्हा आले.

जनता पक्षाने निवडलेले अनेक उमेदवार त्या त्या भागात लोकप्रिय होतेच असे नाही काही काही ठिकाणी तर केवळ एखाद्याची 'सोय' व्हावी म्हणून त्याची उमेदवारी तिथल्या मतदारांवर अक्षरशः लादण्यात आलेली होती. उदाहरणार्थ कुर्लाउपनगरात ४ पैकी ३ जागा कोणतेही भरीव कार्य नसलेल्या मित्रपक्षांना देण्यात आल्या. राहिलेली जागा प्रभादेवीचे रहिवासी असलेल्या तेजबहादूर सिंगना देण्यात आली परिणामी ही जागा काँग्रेस (आय)ने जिंकली. तीच गोष्ट दहिसरची! मुंबईतील या सर्वाधिक मोठ्या महापालिकामतदारसंघात केवळ कोटा पुरा व्हावा म्हणून, वॉर्डकमिटीचा विरोध विचारात न घेता कुणा कुमार म्हात्रे या माजी संघटना काँग्रेस-कार्यकर्त्याला तिकीट देण्यात आले. साहजिकच ९००० मते मिळवून शिवसेनेचे गजानन ठाकरे या ठिकाणी निवडून आले. या भागातले लोकप्रिय प्राध्यापक श्री. मधू घळसासी (माजी समाजवादी) किंवा आणीबाणीत कारावास भोगलेले ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. नारायण पवार या स्थानिक उमेदवारांना तिकीट न देता बाहेरची व्यक्ती लादून पराभव पत्करण्यात शहाणपण कोणते ते एक निवडसमितीच जाणे.

पारसी कॉलनी, विलेपार्ले पूर्व, अभ्युदयनगर, आरे कॉलनी, अणुशक्तीनगर इ. अनेक मतदारसंघात बंडखोरी टाळण्यात जनतानेते यशस्वी झाले असते तर विरोधी पक्षावर जनता पक्ष सहज मात करू शकला असता. विशेषतः जोगेश्वरीत हे सहज शक्य होते. अर्थात काही बंडखोरांनी जनताची मते खाल्ली हे जितके खरे तितकेच ज्यांच्या विजयाची दाट शक्यता होती असे अनेक मातब्बर बंडखोर सहजासहजी गारद झाले. उदाहरणच द्यायचे तर पार्ल्यात नवीनभाई ठक्कर किंवा पुरुषोत्तम रुईया यांचे देता येईल.

जनता पक्षात बाकी कशात नसले तरी, जनसघाला थोपवायचे या मुद्द्यावर अन्य घटकपक्षांचे एकमत असते, हे नव्याने सांगायला नको; पण या जनसघविरोधामुळे श्री. केशवराव गोखले, अरुण देव इ. अनेकांना विजयाची बरीच शक्यता असताना तिकिटे मिळाली नाहीत. परिणामतः काही जागांवर पाणी सोडावे लागले. जनसंघाचा प्रभाव वाढला आहे तो त्यांच्या कार्यकर्त्यांच्या कामामुळे. तसे नसते तर ५ ते १० हजारांची आघाडी मिळविणाऱ्या विजयी उमेदवारात माजी जनसंघाचे आठ जण व अन्य सर्वांचे एक किंवा दोन अशी स्थिती उद्भवली नसती; पण शांती पटेलांच्या कारभारात हेतुपुरस्सर अन्याय केवळ जनसंघीयांवरच होतो असे नाही. माटुंग्याचे

अॅड. गोखले किंवा लक्ष्मण पाटील या माजी समाजवाद्यांनाही हाच अनुभव आला आहे. याचा परिणाम शेवटी कार्यकर्त्यांवर होत असतो. कार्यकर्ते निराश होणे व त्यांनी कार्य न करणे हे शांतीभाईना कदाचित परवडत असेल; पण जनता पक्षाला ते परवडणार आहे का ?

जनता पक्षाच्या प्रचारमोहिमेतील निरुत्साह हासुद्धा आश्चर्यकारक आहे. विशेष म्हणजे निवडणूक ऐन तोंडावर आली असताना जनता सरचिटणीस मधू लिमये स्थानिक वृत्तपत्रांत मुलाखती देऊन जनतातील भांडणं रंगवून-खुलवून सांगत होते. अन्य नेत्यांपैकी एक जॉर्ज फर्नांडिस सोडले तर बाकी कुणाच्या सभा फारशा गाजल्या नाहीत. संघटितपणे व मध्यवर्ती यंत्रणेतून प्रचाराचे सुसूत्रीकरण झाल्याचे दिसत नव्हते. यात एक नोंदणीय बाब म्हणजे उशिरा प्रसिद्ध झालेला व अनेकांना विचारात न घेता काढलेला जाहीरनामा ! या जाहीरनाम्यात मुंबई विकास प्राधिकरण रद्द करण्याबद्दल आश्वासन होते; पण प्रत्यक्षात या प्रश्नावर जनता-नेत्यात मतभेद असल्याची बातमी अलीकडेच उजेडात आली आहे.

जनता पक्षाची मते २५% नी घटली आणि निव्वळ जनता पक्षाला निर्विवाद बहुमत मिळविता आले नाही, या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर हा सगळा विचार केला आहे. यामागील कारणांची व संबंधित व्यक्तींची जनता पक्षाने नीट चौकशी केली तर असमाधानी कार्यकर्त्यांनाही त्यांच्या बाजू स्पष्ट करता येतील.

या निवडणुकीत कॉंग्रेस (आय)ला मिळालेल्या जागांची संख्या अगदीच नगण्य नाही. शिवसेनाप्रमुख पालिकेच्या किल्ल्यावर भगवा झेंडा लावण्याची भाषा करीत होते. आता किल्ल्याच्या उद्यानात 'एकतीस कलमे' उगवली यातही ते आनंद मानीत आहेत. उल्लेखनीय गोष्ट म्हणजे माजी शिवसेनेचे व आता जनतात आलेले पाचही उमेदवार निवडून आले आहेत. नुसता कार्यकर्ता चांगला असून उपयोग नाही, त्याचा पक्षही चांगला हवा, असाच याचा अर्थ आहे.

या निवडणुकीत दादर–गिरगाव भागात शिवसेनेचा धुव्वा उडाला. या भागातल्या शिवसेनेच्या अनेक नेत्यांना जबरदस्त पराभव पत्करावा लागला. अन्य पक्षांचेही काही अतिरथी-महारथी गारद झाले. त्यात कॉंग्रेस (आय)चे भाऊराव पाटील, प्रेमानंद आवळे, जनताचे नारायणराव चव्हाण, वसंत खानोलकर, वामनराव परब, निर्मला कुंटे, अपक्ष नारायणराव आठवले, रुस्तुम तिरंदाज इ. चा विशेषत्वाने उल्लेख केला पाहिजे. खोब्रागडे रिपब्लिकन पक्षाने जनताशी युती मोडली होती; पण परिणामतः सर्वत्र अनामत गमवावी लागली.

या निवडणुकीचा निवडणूक-ज्वर असा जाणवत नव्हताच. जे काय वातावरण होते ते निवळले आहे. जनता पक्षाने मिळालेल्या यशात समाधान न मानता निवडणुकीतील तिकिटवाटपासून प्रचारापर्यंत सर्वच बाबतीत यंत्रणा अधिक कार्यक्षम का होऊ शकली नाही याचा विचार केला पाहिजे. नेत्यांच्या भांडणांमुळे मुळात जनमानसातली प्रतिमा फारशी उज्ज्वल वगैरे नाही. त्यात स्थानिक पातळीवर हा घोळ आणि अव्यवस्था राहणार असेल तर मतांची टक्केवारी पस्तिसावरून पंचविसावर जायला वेळ लागणार नाही. पस्तीस टक्के हा उत्तीर्ण होण्याचा निकष असतो. याची पुढची पायरी 'अनुत्तीर्ण होणे' ही असू नये, इतकेच.

□

---


उज्जैन येथे अलीकडेच झालेल्या जनता पक्षाच्या पहिल्या राष्ट्रीय शिबिरातील घडामोडींचा आँखो देखा हाल.

# क्षिप्रानदीच्या तीरावरून....

एका निरीक्षकाला जाणवलेले ताण-तणाव, सविस्तर तपशिलासह–

**आगामी अंकात**


---

# चिकमगळूरचा निसर्ग घाबरवत नाही, खुणावतो

विनय हर्डीकर

इंदिरा गांधी चिकमगळूरमधून निवडणूक लढवणार हे जाहीर झालं तेव्हाच आपण काही दिवस तरी तिकडे जाऊन यायचं एवढं नक्की झालं. निवडणुकीचा निकाल कसाही लागणार असला तरी आपण ही निवडणूक पाहिलीच पाहिजे असं सारखं मनात येत असे. लहानपणीच कानडी भाषा बोलायला शिकलो आणि कळायला लागलं तेव्हा चांगलंच कानडी बोलत होतो. चांगलं कळायला लागल्यावर पुण्याला आलो आणि घोटाळा झाला. कानडी विसरत चाललं. थोडं–फार गुजराथी यायचं तेही विसरलं. ते कानडीचे प्रतिध्वनी कानात घुमत होते, भाषेची अडचण भासणार नाही याची खात्री होती. तो मुख्य अडसर दूर झाला तरी चिकमगळूरला जाऊन आपण करणार काय, तेही ठरवता येईना. कानडीतून प्रचार करणं, सभांतून भाषणं ठोकणं हे जनता पक्षाच्या दृष्टीनं पंचाईत करणारंच ठरलं असतं. चिकमगळूर जिल्ह्यात एकही ओळखीचा मित्र नव्हता, मित्राचा मित्र देखील नव्हता. हुबळीच्या पलीकडची माती आणि माणसं याच्याआधी कधीच बघितली नव्हती. संबंध आला होता, तो पुण्या–मुंबईकडे येऊन राहिलेल्या त्यांच्या प्रतिनिधींशी. माणसांच्या एका लहानशा उपसागरात ही सिंदबाद–पद्धतीची सफर आपण करावी, प्रचाराच्या गदारोळात सामील न होता सगळं पाहावं, ७७ सालच्या राजकीय ढवळाढवळीतही एखाद्या बेटासारखा अलिप्त राहिलेला 'कानड देश' या नव्या लाटेमध्ये थोडासा तरी विचलित होतो का बघावं, मुख्य म्हणजे कधी घोंगावणारा, वळणं-वळणं घेत धावणारा, मार्ग बदलल्याचे आभास उत्पन्न करणारा, कधी कधी कंटाळा यावा इतका संथ होणारा, उथळ वाटणारा हा जनांचा प्रवाह परत एकदा जवळून पाहावा आणि त्यात पुढे–मागे होणारा एक बिंदू अशी स्वतःची ओळख पटवून घ्यावी ही ऊर्मी अनावर झालेली होती.

मित्रमंडळींची प्रतिक्रियाही मोठी मार्मिक होती तू ७७ साली धुळे जिल्ह्यात गेलास, उत्तमराव पडले, दिलवरसिंग पाडवी पडले, विधानसभा–निवडणुकांत सांगली जिल्ह्यात तू हिंडलास एक-दोनच मतदारसंघात–पण उमेदवार सगळेच्या सगळे पडले; आता तरी जनता पार्टीवर दया कर आणि या वेळी निदान वीरेंद्र पाटलांचा प्रचार करू नकोस, करायचाच असला तर इंदिराबाईंचा कर, हा एक खास ढंग. तिकडे जाऊन करायचंय काय? प्रदेश, भाषा, राजकारण सगळं वेगळं. दहा-बारा दिवसांत काय पाहणार, काय कळणार? निवडणुकीचं काय होणार ते ठरलेलंच आहे. दीड ते दोन लाखांच्या मार्जिननं बाई येणार, हा दुसरा जास्त शहाणा, व्यवहारी ढंग! माझ्या एका प्राध्यापक मित्रानं एक चिठी पाठवली. मोठा बुद्धिमान, तरतरीत आणि विद्यार्थिप्रिय प्राध्यापक आहे हा. तरुण तर आहेच. प्रतिकात्मक भाषा वापरून विचारलं, 'दगड आणि वीट दोन्ही डोकं फोडतातच, मग दगडापेक्षा वीट मऊ, असं म्हणण्यात काय अर्थ उरतो? चिकमगळूर आटपून परत आलास की मला सांग!' ही त्याची भूमिकादेखील काही एकट्याची नव्हती; अनेकांना तसंच वाटत असणार. खरोखरच गेल्या काही महिन्यांत घटना अशा झपाट्यानं घडताहेत की त्या झपाट्यात वाहून जाणाऱ्यांनाही त्यांचा विचार करता येत नाही आणि जे काठावर आहेत, थोडे अंतरावर आहेत त्यांना यात कुठे शिरावं हे ठरविता येत नाही. पलीकडच्या तीराला लागण्याची खात्री वाटत नाही. आणीबाणीविरुद्धच्या लढ्यात मी उतरलो, थोडासा भार उचलला. जनतेत इंदिराजींचा पराभव केला तेव्हा एक टप्पा पूर्ण झाला असं वाटलं. येती काही वर्षं बघायला नको, लोकशाही सुरक्षित आहे अशी खात्री वाटू लागली; पण सत्य वेगळंच होतं. लोकशाहीच्या सुरक्षिततेची गॅरंटी एकाच निवडणुकीत मिळेल हा भ्रम होता. जनता पक्षाची लोकशाही कार्यपद्धती लोकशाहीलाच मारक ठरते की काय, अशी एकीकडे भीती, तर अत्यंत वेगानं इंदिरा गांधींच्या परतीचा प्रवास दुसरीकडे चालू झालेला. या ना त्या प्रकारे त्या देशातील सर्वांत ताकदवान राजकारणी व्यक्ती आहेत हे जाणवत असलेलं. त्यातच दोन वर्षं दडपल्या गेलेल्या सगळ्या समस्या परत परत डोकी वर काढू लागल्या, अंगात आल्याप्रमाणे घुमू लागल्या. देश अराजकाकडे जात आहे हे ७५ सालचं बाईंचं वाक्य जनता–नेत्यांच्या तोंडी आलं. ते अवघ्या तीनच वर्षांनी. अनेक तुकड्यांचा तयार झालेला जनता पक्ष एकसंध होईना आणि एकसंध वाटलेल्या कॉंग्रेसचे तर असे तुकडे झाले की सत्तेशिवाय कॉंग्रेस असूच शकत नाही याची खात्री पटली. आरोप-प्रत्यारोप, पत्रकं-उत्तरं, पाठिंबा-निषेध, मेळावे-अधिवेशनं यांच्या गदारोळात जनता पक्षाच्या समर्थकांनादेखील पक्षाच्या काही आघाड्यांवरच्या यशाचा विसर पडायला लागला दुसऱ्या एकोणीस महिन्याच्या शेवटी दगड आणि वीट यांच्या कडकपणाची किंवा मऊपणाची परत एकदा कसोटी लागण्याचा क्षण इंदिरा गांधींच्या या नव्या निर्णयामुळे आला. फार महत्त्वाच्या अशा या क्षणापासून आपण दूर असता कामा नये, त्याला साक्षी असावं असं मी ठरवलं.

जवळजवळ एक महिनाभर सगळ्या देशाचं लक्ष चिकमगळूर जिल्ह्याकडे लागलेलं होतं. जगातले अनेक राजकीय निरीक्षक कान टवकारून होते. जेव्हा नकाशावरून शोध घेतला तेव्हा नैर्ऋत्येकडचा हा छोटासा जिल्हा आपल्याकडल्या महाबळेश्वर, जावळी भागासारखा असेल आणि भोर, जुन्नर या गावांसारखंच चिकमगळूरही

तिन्ही-चारी बाजूंना डोंगर घेऊन वसलेलं, खडकाळ प्रदेशाचं ठिकाण असेल असं वाटलं; पण गाडीनं महाराष्ट्र ओलांडला, कृष्णा नदी ओलांडली आणि भूमी पालटू लागली. जास्त सुंदर, जास्त संपन्न आणि जास्त सुखदायी वाटायला लागली. आमचा आपला राकट, कणखर, दगडांचा देश पश्चिमघाट सोडला तर जवळजवळ सगळी-कडे जनलोकांनी मन लावून झाडं तोडलेली आणि शासनानं तर दलदलीच्या प्रदेशात लावायला जास्त उपयुक्त असलेली निलगिरीची झाडं दुष्काळी पट्ट्यातच लावलेली. कर्नाटकातली विस्तीर्ण शेतं, झाडीनं झाकलेल्या लहान-मोठ्या टेकड्या, भरपूर पाणी असलेले ओढे-नाले, गडद लाल-भगव्या रंगाची मंगलोरी कौलांची घरं असलेली लहान-मोठी शहरं आणि या निसर्गसुंदर पसाऱ्यात न शोभणारी कळकट, सुस्त, बेशिस्त माणसं पाहाताना मधूनच निवडणुकीचा विषय काढून पाहत होतो. जनसामान्यांचं मत कितीही चांगलं असलं तरी वीरेंद्र पाटील निवडून येणं अशक्य आहे. निदान ५०,००० मतांनी पडतील असंच साधारण असायचं. माझ्याबरोबरच्या प्रवाशांपैकी फक्त एकानंच चिकमगळूर पाहिलेलं होतं – केसरीचे वार्ताहर अरविंद गोखले. एरवी कानडी, मराठी, गुजराती असे अनेक लोक असूनही चिकमगळूर न पाहताच इंदिराजींच्या विजयाबद्दल छातीला हात लावून बोलत होते. का, कसं या प्रश्नांची उत्तरं त्यांना देता येईनात. प्रदेश खेडवळ, अशिक्षित लोकांचा. शहरं थोडी, डोंगराळ भाग फार. हिंडणं-फिरणं अत्यंत कटकटीचं. कित्येक लोकांना आणीवाणी येऊन गेल्याचंही माहीत असेल-नसेल आणि देवराज अरस यांचं हुकमी निवडणूकतंत्र ही पुण्याला परत परत ऐकलेली कारणंच चर्चेत पुन्हा पुन्हा यायची. फर्स्ट हँड माहिती फक्त गोखल्यांना; पण त्यांना कानडी येत नसल्यामुळं दुहेरी पंचाईत होती. आमच्या चर्चेत त्यांना शिरता यायचं नाही आणि दुभाषाच्या मदतीनं त्यांनी जी माहिती मिळवली ती सर्वांना विश्वसनीय वाटायची नाही. चिकमगळूर निवडणुकीच्या बाबतीत दोन्ही पक्षांचे अनेक कार्यकर्ते, पत्रकार वास्तवापासून दोन टप्पे दूरच राहिले. कारण भाषेचा चकवा प्रत्येक ठिकाणी आड येई.

चिकजाजूर जंक्शन ओलांडलं की दक्षिणेकडे दूर अंतरावर डोंगराच्या रांगा दिसू लागतात. हेच ते बाबाबुदागिरी. या रांगा चिकमगळूर जिल्ह्याच्या मध्यभागी आहेत आणि सहा ते साडेसहा हजार फूट उंच आहेत. पश्चिम घाटाला जवळ असलेल्या आपल्या-कडच्या कुठल्याच इतर जिल्ह्यात असे पर्वत नाहीत. उत्तर-दक्षिण सह्याद्रीला पूर्व-पश्चिम फाटे फुटतात आणि जिल्ह्यात पसरतात; परंतु पश्चिमेकडे जात राहिलं की डोंगराळ भाग वाढत वाढत आपण कोकणकडा उतरतो आणि समुद्राकडे जातो. बाबाबुदानगिरी तसे नाहीत. कोकणकड्याला जोडलेले नाहीत. बिरूर-कडूर हे पूर्वेकडचे मतदारसंघ तर तरिकेरी-मुडिगेरी हे उत्तर व दक्षिण भागातले पश्चिमेकडचे मतदारसंघ पूर्ण सपाटीवर आहेत. तरिकेरी भागातलं भद्रावतीचं सुंदर धरणही या बाबाबुदान रांगांचा डोकं वापरून वापर केल्यामुळंच शक्य झालं आहे. पर्वत आहेत, प्रचंड पर्वत आहेत ते चिकमगळूर, शृंगेरी या मतदारसंघांत आणि मुडिगेरी तरिकेरी या मतदारसंघाच्या उत्तर आणि दक्षिणेकडे यातच जोडलेले कारकळा आणि बेलतंगडी हे त्यांच्या कोकणातले मतदारसंघ, पुणे मतदारसंघात महाड-पोलादपूर किंवा भोरमध्ये सुधागड पाली असल्यासारखाच हा प्रकार मुद्दाम-घडविलेला. राजकारणासाठी कारकळा आणि बेलतंगडी नेहमीच दूर असल्यासारखे अप्रस्तुत वाटायचे. हवामानात भयंकर फरक होता आणि दूर असल्यामुळे सहजासहजी जाता यायचं नाही. बाबाबुदानगिरीमधल्या रांगांतून ८० ते १०० इंच पाऊस पडतो आणि नेहमीच्या पावसाळ्याशिवायही ऑक्टोबर-नंतरही अधूनमधून पाऊस चालूच असतो. चिकमगळूरचे ते सुप्रसिद्ध कॉफीचे मळे, काही थोडे चहाचे मळे याच डोंगरातून आहेत. मैलोमैल पसरलेली सागाची आणि बांबूंची जंगलं आहेत. वाघ थोडेफार आहेत, जंगली हत्तींचे कळप आहेत. भयानक कडे, सुळके, पाताळावेरी वगैरे पोचलेल्या भीषण दऱ्यांचा हा निसर्ग नाही. आपल्या-कडच्या बेसाल्टमुळं डोंगरांची शिखरं उघडी राहतात. बाबाबुदानगिरीचा दगड त्या प्रकारचा नाही. आकाशातून पाहिलं तर हिरव्या रंगाची झूल अंगावर पांघरलेल्या खूप हत्तींचा कळप शांत उभा राहिल्यासारख हे पर्वत दिसत असतील. तुंगा आणि भद्रा या दोन्ही नद्यांचे उगम याच रांगांतून आहेत, शृंगेरीच्या जवळपास आहेत. भद्रा मुख्यत: चिकमगळूर जिल्ह्यातून जाते तर तुंगा चिकमगळूरमध्ये उगम पावून शिमोगा जिल्ह्यातून वाहात पूर्वेकडे पठारावर येते. त्यांचा कुडालीजवळ संगम झाला की, तुंगभद्रा नदी तयार होऊन कर्नूलजवळ कृष्णेला मिळते. चिकमगळूरचा निसर्ग घाबरवत नाही, खुणावतो. त्याचं रूप शांत, गंभीर. प्रौढ आहे. भीषण नाही, छचोर थिल्लर असंही नाही. टेकड्यांचा लडिवाळपणा नाही– कड्यांचं भेडसावणं नाही. सौम्य, प्रशांत आवाहकता मात्र भरपूर आहे. तिकडून परत आल्यावर फ्रान्स मित्रमंडळासारखं एखादं चिकमगळूर मित्रमंडळ काढावं असं सारखं मनात येतं आहे.

अठरा तासांचा अंग आंबवणारा प्रवास संपवून बिरूरला उतरलो तेव्हा सव्वापाच वाजले होते. चिकमगळूरची बस स्टेशनच्यावाहेरच उभी होती. निवडणूक-प्रचार ऐन भरात आल्यावर वीरेंद्र पाटलांनी मिरज-बंगलोर महालक्ष्मी एक्स्प्रेस कडूरलाही थांबवण्याचं आश्वासन दिलं व गाडी थांबू लागलीही. आता परत काय झालंय कोण जाणे. कडूर जेमतेम चार मैलांवर दोन्ही तालुक्यांची गावं सांगली–मिरजे-सारखी, पण लहान लहान, थोडी अधिक स्वच्छ. निवडणुकीची पोस्टर्स दोन्ही पक्षांची ऑफिसं, झेंडे लावून जाणाऱ्या, स्पीकर्स बसविलेल्या मोटारी इकडून तिकडे जाताना दिसू लागल्या. कडूरच्या बस-स्टँडजवळ इंदिरा गांधींचा कार्यक्रम झाला असावा. तिरंगी हँडबिल्स, पताका, पंजाची पोस्टर्स, बाईंची छायाचित्रं असलेली पोस्टर्स यांची प्रचंड झिम्मड. हसतमुख इंदिराजींची दोन दर्शनं. एक समोरून, बरंच जवळून; दुसरं थोडं अंतरावरून, एका बाजूनं, दोन्हीमध्ये हात उंचावलेला. याच हाताबद्दल पुण्याला 'क्या एमरजन्सीमे थोडा हाथ दिखाया था ?' असं बाजपेयी म्हणाले होते, तर दुसऱ्याच दिवशी माजी खासदार चंद्रगौडा 'इदु देशद वरदहस्ता' (हा देशाचा वरदहस्त आहे) असं आल्दूरच्या सभेत म्हणणार होते.

निवडणूक म्हणजे लोकशाहीतलं युद्धच असतं आणि युद्धकाळाचं मुख्य वैशिष्टच म्हणजे संशय. संशय निर्माण होऊच नये म्हणून मग आपल्या पक्षाचे बॅजेस, झेंडे लावायचे. ते नसतील तर मग फार पंचाईत होते. बसमध्ये अफाट गर्दी होती. शेजारचा माणूस कोणत्या

पक्षाचा असेल ? कळना. हाच प्रश्न त्यालाही पडला असावा. त्यातच मी गोखल्यांशी मराठीतून बोलत होतो. निवडणुकीचं विचारताच प्रथम तो 'चालायचंच बघू या काय होतंय. शेवटी मतदार काय करतील ते खरं' वगैरे म्हणू लागला. पुण्याहून आलोय म्हटल्यावर त्याच्यावर चांगलीच छाप पडली. एक–दोन वाक्यातच त्यानं पक्ष कोणता ते विचारलं. माझ्या मनात एकदा आलं की आय–काँग्रेस म्हणावं; पण म्हणवेना आणि दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांत तटस्थपणे फिरण्याचे सगळे पुण्यात बसून केलेले बेत ढासळले. लोकशाहीत एक वेळ कुंपणावर बसता येतं, माणसं बसतात. मोठी वसतात, बसणारी काही वेळा मोठी होतात; पण प्रत्यक्ष युद्धभूमीवर कुंपणावर बसता येत नाही. तुम्हाला बाजू घ्यावीच लागते. स्वतःला फसवण्याचा तो क्षण असतो. फार काळ स्वतःला फसवता येत नाही. जनता पार्टी म्हणूनच मला सांगावं लागलं आणि बोलण्यामधला पडदा एकदम दूर झाला. दावणगिरीचा लिंगायत समाजातला तो बाबा धडाधड बोलायला लागला. विडी ओढणार का विचारू लागला. दावणगिरीच्या लोकांनी या निवडणुकीसाठी निजलिंगप्पा आले असतांना एक लाख रुपये जमवून दिलेत वगैरे सांगू लागला. मनमोकळेपणा येताच त्यानं पुढचा निष्पाप प्रश्न विचारला-तुमची जात कोणती ? कर्नाटकातच काय पण महाराष्ट्रातही शहराबाहेर हा प्रश्न माणसं अगदी बिनधास्त विचारतात. कर्नाटक–आंध्रमध्ये तर शहरी माणसं, सुशिक्षित माणसं मुळीच संकोच न करता विचारतात. ब्राह्मण हेच उत्तर द्यावं लागतं. कारण मी जात मानत नाही वगैरे शुद्ध बौद्धिक कसरतीमुळे तो माणूस कदाचित बोलायचा बंद होण्याची शक्यता असते. आम्ही महाराष्ट्रातले उदारमतवादी दोन कारणांनी अडचणलेले असतो. एक तथाकथित उच्च जातीत जन्म घेतला म्हणून आणि दुसरं इतरांची जात माहीत असूनही ती विसरण्याची धडपड चालू असते म्हणून. त्या माणसानं थोडं आश्चर्य दाखवलं; पण लगेच या वेळी तुमचे लोकही आपल्या पक्षाकडे आहेत, सांगवत नाही ते खालच्या जातींचं आणि मुसलमानांचं; पण आपण इतर लोक एकत्र आलो तर त्यांची मतं अशी असणारच किती, वगैरे बोलेपर्यंत सकरपट्टणचा घाट चढून गाडी चिकमगळूरच्या आसमंतात आली. दिवे दिसू लागले. छोटेसं गाव. अंधारात देखील तीन बाजूंना पसरलेल्या बाबाबुदान रांगांचे अस्पष्ट आकार जाणवत होते. जिल्ह्याच्या गावाभोवती नेहमी असतात तशा डाकबंगला, कॉलेज, कोर्ट, शाळा वगैरेच्या इमारती दिसू लागल्या होत्या. रस्त्यातून माणसांची गर्दी होती. राजकीय प्रचारात नसलेली वाहनं फार थोडी होती. लहान मुलीचं ते लहानसं गाव एकदम प्रकाशात आलं होतं. मोठ्या दडपणाखाली सापडलं होतं. त्याचे डोळे दिपत होते की अजून उघडायचेच होते ?

[ क्रमशः ]

# अलिगड दंगलीनंतरचे कवित्व

प्रा. अशोक मोडक

अलिगडची जातीय दंगल १२ सप्टेंबरला सुरू झाली आणि पुरेसे चढ-उतार अनुभवल्यानंतर ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात आटोक्यात आली; पण दंगल संपल्यावरच पुढारीवर्गाने तिथे जाऊन पाहाणी वगैरे करायची असते. तेव्हा अशी पाहाणीही झाली. पाठोपाठ पत्रकबाजी सुरू झाली व सारे वातावरण कसे चैतन्याने भरून गेले. आपल्याकडचा हा नेहमीचाच प्रघात झाला आहे. या पुढाऱ्यांची ही पत्रके मोठी महत्त्वपूर्ण असतात यात काही शंकाच नाही. मुळात आपल्या देशाविषयीच्या कळकळीने ओथंबलेली ही पुढारी मंडळी आपल्याला भारावून टाकतात. त्यांचे सारे जीवनच आपल्या देशातला मागासलेपणा व धर्मभोळेपणा नष्ट करण्यासाठी खर्ची पडत असते. तेव्हा अशी दंगल होण्याचा अवकाश, हे महाभाग अक्षरशः धावून जातात. त्यांची धावपळ किती होते हे कुठल्याही पत्रकावरून लक्षात येते. कोणत्या पुढाऱ्याने किती अल्प वेळात केवढा लांबलचक प्रवास केला हे अगदी रसाळपणे पत्रकात सांगितले जाते. पत्रकाची सुरुवात अशा गतिमान वर्णनापासून होते तर पत्रकाची अखेर म्हणजे पिढ्यान् पिढ्यांनी जपून ठेवावेत अशा उपदेशांनी भरलेली असते. परिस्थितीचे विश्लेषण करावे व मोठ्या निकडीने 'जनहो खादी वापरा' या वाक्याच्या चालीवर 'जनहो, शांतता राखा' अशा मार्गदर्शनाची खैरात करावी या पुण्यकर्मासाठीच भूतलावर अवतरलेल्या या पुढाऱ्यांचे आपण सद्‌गदीत मनाने आभार मानले पाहिजेत.

हे सर्व आठवण्याचे कारण अलिगडला झालेली दंगल ! एक तर हिन्दू आणि मुसलमान असे अधूनमधून हमरीतुमरीवर येतात, परस्परांचे गळे घोटतात, पर्यायाने जातीयवादी पक्षांना खतपाणी घालतात व दुसरे म्हणजे थेट अलिगडलाच हे दंगे घडवितात. अलिगड म्हणजे काही साधेसुधे शहर नाही. या शहराला इतिहास आहे भूगोल आहे, आणखीही बरेच काही आहे; पण नुकतीच झालेली पत्रकबाजी बघितल्यानंतर लक्षात येते की या शहराचे भविष्यही तसे उज्ज्वलच आहे.

आता या दंगलीनंतर पत्रके काढणाऱ्यांची नावेच केवळ डोळ्यांखालून घाला म्हणजे माझे म्हणणे तुमच्या सहज लक्षात येईल. राजनारायण आणि कृष्णकान्त या दोघांची तुम्हाला ओळख आहेच. आपल्या इमर्जन्सी फेम इंदिराबाई साऱ्या दुनियेला माहीत आहेत. खुद्द अलिगडचेच खुर्शिद आलम खान त्या पंचक्रोशीत खूपच प्रसिद्ध आहेत. कारण इंदिरा काँग्रेसचे ते पुढारी आहेत. इंदर मल्होत्रा हे एक इंग्लिश पत्रकार आहेत. या सर्वांची वक्तव्ये अथवा पत्रके तुम्ही

वाचली असतीलच. देशात सेक्युलॅरिझमचे झाड बहरावे असे तुम्हास वाटते का ? तर मग ही वक्तव्ये पाठ करा, घरी फ्रेम करून भिंतीवर लटकवा. मीही तुमच्याप्रमाणेच ही पत्रके व वक्तव्ये वाचली; पण तरी माझी अस्वस्थता काही केल्या संपुष्टात आली नाही. आमच्या सुभद्रा जोशी एवढ्या मोठ्या दंगलीनंतर स्वस्थ कशा बसल्या आहेत ? या प्रश्नामुळेच मी अस्वस्थ होतो; पण २५ ऑक्टोबरच्या वृत्तपत्रांनी सुभद्राबाईच्या सांप्रदायिकताविरोधी समितीचे पत्रक प्रसिद्ध केले तेव्हा कुठे माझा जीव भांड्यात पडला.

मंडळी, सांप्रदायिकताविरोधी समिती ही संघटना फार मोठ्या लौकिकाची आहे. तुम्ही शांतता आणि बंधुभाव परिषद, ब्लिट्झ नॅशनल फोरम अथवा भारत सोव्हिएत मैत्री संघ वगैरे आघाड्यांची नावे ऐकली आहेत ना ? डावा, पुरोगामी विचार या भूमीत रुजावा या उदात्त हेतूने या सर्व आघाड्या व संघटना काम करीत असतात. सुभद्रा जोशींची सांप्रदायिकता विरोधी समिती देखील याच उदात्त हेतूने प्रेरित झाली आहे. दंगल झाली रे झाली की या समितीचे कार्यकर्ते पत्रक काढून मोकळे होतात. मधूनमधून परिषदा व संमेलने योजावीत, नियतकालिके चालवावीत आणि तमाम प्रतिगामी शक्तींना चांगले चिरडून टाकावे हाच या समितीचा हेतू असतो. आपले माजी न्यायमूर्ती श्री. गजेन्द्रगडकर हे देखील या समितीच्या व्यासपीठावर एकदा हजेरी लावून गेले आहेत. तेव्हा त्यांना उपराष्ट्रपती व्हायचे होते म्हणून या समितीकडून दिले जाणारे राष्ट्रीयत्वाचे शिफारसपत्र आवश्यकही होते. (आता कदाचित् ही द्राक्षे आंबट झाली असावीत म्हणूनच शंकराचार्यांना आपल्या भूतपूर्व न्यायाधिशांचा मंगल सहवास लाभत आहे !)

तात्पर्य काय, अशा महत्त्वपूर्ण समितीने ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात जागे व्हावे आणि इतक्या उशिरा पत्रक काढून आम्हा अजाण पामरांना झोपेतून उठवावे या दुर्दैवाला काय म्हणावे ? सुभद्राबाई, इतका उशीर बरा नाही. एवढा वेळ थांबलात तर सांप्रदायिकता फोफावत जाईल व मग हा देश रसातळाला गेला तर भविष्यातल्या पुरोगामी पिढ्या तुम्हाला शाप देतील. म्हणून पूर्वीप्रमाणेच विशेष विचार न करता झटपट वक्तव्य देत जा, पत्रके काढत जा !

सुदैवाने एकदाचे हे पत्रक प्रसिद्ध झाले व सदर कवित्वात सहभागी झालेल्या सर्व कविश्रेष्ठांची जातकुळी एकच आहे. हे आमच्या लक्षात आले. हे सर्वजण डावे आणि पुरोगामी आहेत, तसेच या सर्वांना एका धोंड्यात दोन पक्षी मारायचे आहेत : एका पक्ष्याचे नाव जनता तर दुसऱ्या पक्ष्याचे नाव आहे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ. वरं, मुहूर्त आहे चिकमगळूरची निवडणूक व त्या निमित्ताने होणाऱ्या प्रचाराचा.

या सर्व पुरोगामी पत्रकांनी अलिगड दंगलीबद्दल संघवाल्यांना आरोपी क्रमांक एक हा किताब दिला आहे, तर जनता पक्षाच्या सरकारला दोन नंबरचा आरोपी ठरविले आहे. हे सारे आरोप फार भयानक आहेत. ही घ्या प्रस्तुत आरोपांची यादी.

१) अलिगडच्या माणेक चौकात अल्पसंख्याकांचे बरेच नुकसान झाले आहे. हे नुकसान कोणी केले हे अगदी सर्वांना ठाऊक आहे. कारण तिथे हिंदू माणसे बहुसंख्य आहेत व या हिन्दूंमध्ये बहुसंख्य जण व्यापारी आहेत. आता हा पुरावा किती बोलका आहे हे काय सांगायला पाहिजे ? हिन्दूंची संघटना कुणाला हवी आहे ? अन् शेटजी-भटजींचे वर्चस्व कोणत्या संघटनेत दिसून येते ? या संघवाल्यांचेच हे कारस्थान आहे यात काहीही शंका नाही. आणखी वेगळा पुरावा कशाला मागता ?

२) जनता पक्षाच्या अलिगड शाखेचा अध्यक्ष कोणीएक नवमान नावाचा माणूस आहे. हा म्हणे पूर्वाश्रमीचा जनसंघाचा आहे. याने गावात कर्फ्यू असताना चक्क त्या आज्ञेचा भंग केला. त्याच्याजवळ पोलिसखात्याने दिलेला पास होता म्हणून काय झाले ? हा संघवाला आहे हे मान्य आहे ना ? मग त्याला मोकळे का सोडले ? याचाच अर्थ तमाम संघवाले जनता सरकारच्या आशीर्वादाने जातीय दंगे पेटविण्यास तयार झाले आहेत.

३) उत्तर प्रदेशच्या व अलिगड जिल्ह्याच्या प्रशासनयंत्रणेत संघाने घुसखोरी केली आहे. एक फौजदार तर चक्क गुरुदक्षिणेच्या उत्सवाला उपस्थित होता. तो घटनेचा इन्कार करीत असेलही; पण दक्षिणा देतानाच त्याने शपथ घेतली असेल की अमुक अमुक माणसांचे रक्त सांडायचे. केवढा जबरदस्त पुरावा आहे हा ! मग का नाही या फौजदाराला तुरुंगात टाकले ?

४) सांप्रदायिकता विरोधी समितीचे डॉ. श्रीमाळी (बरोबर, आपले माजी शिक्षणमंत्री ते हेच.) यांनी तर संघाने बाहेरून माणसे आणली व दंगल पेटविली असा आरोप केला आहे. संघाचे स्वयंसेवक खरेच पूर्ण वेडे आहेत. चक्क गणवेष घालून त्यांनी हल्ले केले असतील; पण समजा, गणवेष वगैरे काही अंगावर नसेल तरी संघाचे सैनिक चटकन् ओळखता येतात. मागे कॉम्रेड डांगे यांनी काय शोध लावला होता हे माहीत आहे ना ! ज्या अर्थी मृत माणसांचे कोथळे नीट चिरले गेले नव्हते त्या अर्थी सुरे चालविणारे महाभाग नवशिके होते असेच म्हटले पाहिजे. म्हणजेच संघांत हवेमध्ये जंबिया चालविणाऱ्या स्वयंसेवकांनी ही भोसकाभोसकी केली असेल असा निष्कर्ष काढला पाहिजे.

५) श्री. इन्दर मल्होत्रा यांनी आपल्या क्षेत्रात (टाइम्स ऑफ इंडिया, दिनांक २६-१०-१९७८) संघ, जनता सरकार यांच्याप्रमाणेच जनता पक्षाचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर यांनाही धारेवर धरले आहे श्री. चंद्रशेखर यांनी राजनारायण आणि कृष्णकान्त यांच्या सुरात सूर मिळवून संघाला झोडपले नाही, हा काही लहान-सहान गुन्हा आहे असे वाटले की काय ? चन्द्रशेखरसाहेब असे म्हणाल्याचे ऐकिवात आहे की, संघ एक संस्था म्हणून या दंगलीत सहभागी झाला नाही; पण संघाच्या स्वयंसेवकांबद्दल मात्र कसलीही शाश्वती देता येत नाही. इन्दर मल्होत्रा यांना अशा विधानाचा मनस्वी संताप आला आहे. का म्हणून संघाच्या संस्थेला दोषमुक्त करावे ? पण मल्होत्राजींनी यामागे जी तर्कसंगती शोधून काढली आहे ती थक्क करणारी आहे. सध्या जनसंघाच्या जनताधिष्ठित मंडळींनी चरणसिंगांची तळी उचलून धरण्याचे सोडून दिले आहे. तेव्हा चन्द्रशेखर व जनसंघी कार्यकर्ते यांचे गूळपीठ जमले आहे. जोडीला मोरारजींचा विरोध हाही एक सामाईक गुणधर्म – Common Factor – या गूळपीठाची गोडी वाढवीत आहे. चन्द्रशेखरमहोदयांना जनसंघ-

पृष्ठ २४ वर

# मंत्रालयातील तामिलसंघम्

बँकेच्या अलीकडील मंत्रालय. काही महिन्यांपूर्वीच वीट आलेली काँग्रेसची सत्ता गेली. मंत्रालयात नवीन शासन आले. तीस वर्षाहून जास्त काळ सत्तेवर असलेला पक्ष व तीमधील माणसे बाजूला होऊन त्यांचे जागी नव्या दमाची, वेगळ्या विचारसरणीची, अलग राजकीय संस्कृतीची माणसे सत्तेच्या खुर्च्यांवर विराजमान झाली. लोकांना दिलासा मिळाल्यासारखा झाला. नवे शासनकर्ते जुन्यातील चांगल्याचे जतन करून वाइटाचे निर्मूलन करतील अशी हवा निर्माण झाली. पाड्यापासून वाड्यापर्यंत, खेड्यापासून शहरापर्यंत सर्वांचे कान व डोळे मंत्रालयाकडे वळले.

पण मंत्रालय म्हणजे काय ? ह्याचा बोध होणे हे महाकठीण ! मंत्रालयात मंत्री व सचिव अशी दोन सत्ताकेंद्रे असतात, ह्याची जाण फारच थोड्यांना असते सर्व लहान-मोठे निर्णय घेताना मंत्र्याचा शब्द शेवटचा ! हा शेवटचा शब्द कोण उच्चारतो हे मात्र ऐकू येणे अवघड. लोकांचा समज असा की, आपल्या पक्षाची नीती लक्षात घेऊन मंत्रीच निर्णय घेतात. तसे घडलेही; पण क्वचितच.

मग प्रत्यक्षात काय घडते व कसे ह्याचा मागोवा घेण्यासाठी एका प्रकरणाची वाट शोधत शोधत मंत्रालयातील जिने चढू या.

आजकाल दुर्बलांसाठी सर्व शासन झटत असलेले दिसते. आदिवासी हे दुर्बल म्हणून त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी आदिवासी उपयोजना नावाची पंचवार्षिक योजनेतच एक खास तरतूद केली गेली. ह्या उपयोजनेची बरीच अंगे आहेत; पण त्यात आदिवासींची शोषणमुक्तीसाठी आखलेली एकाधिकार खरेदी योजना सर्वांत महत्त्वाची. आदिवासींची आर्थिक प्रगती साधण्यासाठी आदिवासी विभागातील व्यापाऱ्यांच्या स्वरूपात वावरणाऱ्या जळवांचे दहन करणे अत्यावश्यक आहे व त्यासाठी आदिवासी-क्षेत्रात पिकणाऱ्या महत्त्वाच्या पिकांची खरेदी शासनाशिवाय कोणीही करण्यास कायद्याने बंदी घातली. ह्या बंदीमुळे व्यापाऱ्यांचे हितसंबंध दुखावले गेल्यामुळे श्री. वसंतदादांच्या शासनाने १९७८ च्या विधानसभेच्या निवडणुकीवर डोळा ठेवून बंदी काढून घेतली व आदिवासी-क्षेत्रातील जवळजवळ सर्व जागा घालवल्या. हा निर्णय दादांचा स्वतःचा. खात्याचे मंत्री व सचिवांनी बंदी काढून घेऊ नये म्हणून दिलेला सल्ला मुख्य मंत्र्यांनी मानला नाही व त्याचे परिणाम त्यांनी व त्यांच्या पक्षाने भोगले. ह्यातील निर्णय घेण्याची पद्धत निर्दोष व बिनचूक अशीच होती.

ही झाली १९७७–७८ ची कहाणी. दादांनी स्वतः निर्णय घेतला. त्यात त्यांच्या संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी व सचिवांनी विरुद्ध मत दिले; पण आज सत्तेवर असलेल्या पक्षाच्या एका महत्त्वाच्या व्यक्तीनेसुद्धा दादांना पत्र लिहून एकाधिकार खरेदी बंद करून व्यापाऱ्यांशी शासनाने स्पर्धा करावी असा सल्ला दिला होता. १९७८–७९ चा निर्णय घेण्याची पद्धत मात्र गंमतीशीर होती. १९७७–७८ साली असलेले खात्याचे मंत्री आता उपमुख्यमंत्री झाले होते व खात्याचे सचिव उपमुख्यमंत्र्यांचे सचिव झाले. उपमुख्यमंत्र्यांनी मे १९७८ मध्येच चार–पाच जाहीर भाषणांत ह्या वेळी सर्व आदिवासी क्षेत्रात एकाधिकार खरेदी होणार म्हणून सांगून टाकले. फक्त औपचारिकरीत्या निर्णय घेणे बाकी राहिले. त्यासाठी आदिवासी उपयोजना मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली. खात्याचे मंत्री व सचिव नवीन. पहिल्याला आदिवासींमध्ये रस नाही व दुसऱ्यास आर्थिक नियोजनाचा गंध नाही. ह्या दोघांनी सादर केलेल्या टिपणीत ४८ आदिवासी विभागांपैकी २० विभाग एकाधिकाराखाली आणावेत असे सुचविले; पण उपसमितीने ते मानले नाही व तडजोड म्हणून ४० विभागात एकाधिकार खरेदी करण्याचा निर्णय झाला. ह्याबरोबरच कोणत्या विभागात कोणता माल एकाधिकाराखाली आणावयाचा हे ठरविण्याचे अधिकार खात्यास देण्यात आले व योजनेसाठी १ कोटी ६० लाख रुपये मंजूर करण्यात आले.

वरील निर्णय झाला मे १९७८ मध्ये. निर्णय झाल्यावर शासकीय यंत्रणेने प्रशासकीय पावले उचलावयास पाहिजेत. व्यापार करावयाचा म्हटले म्हणजे बरीच तयारी करणे भाग असते. हे काम खात्याचे सचिवास करावे लागते. ही कामे म्हणजे शासनाचे एजंटास खरेदी करण्यास लागणारी माणसे व सामुग्री तयार ठेवण्यास लागणारी आर्थिक तरतूद करणे, शेत व जंगलमालाची विभागीय निवड करणे, कायद्याच्या तरतुदीनुसार किंमती ठरविणे, परवाने देणे, झडती–जप्ती करणे इत्यादी. अधिकारांचा वापर करण्यासाठी अधिकारी घोषित करणे वगैरे कामे. ही कामे करण्यास बराच विचार करावा लागतो. बऱ्याच लोकांशी चर्चा करावी लागते. विशेषतः माल खरेदीस लागणाऱ्या पैशाची उभारणी करण्यासाठी बोलणी करावी लागतात. मे १९७८ ला निर्णय होऊनसुद्धा सचिवांनी खंबीर पावले उचलली नाहीत. त्याची दोन उदाहरणे खालीलप्रमाणे–

(अ) मे १९७८ ला मंत्रिमंडळाच्या उपसमितीने एकाधिकार खरेदीस १ कोटी ६० लाख मान्य केले; पण मंत्रालयात मंत्र्यांपेक्षा एक अज्ञात आणि सुप्त शक्ती वावरत असते. ती दुसरी-तिसरी कोणी नसून खात्यांचे सचिव. प्रस्तुत प्रकरणी वित्त, नियोजन व आदिवासी कल्याण खात्याचे सचिव ह्या तिघांचा संबंध. मंत्रिमंडळाचे उपसमितीने एकदा निर्णय दिल्यावर खरे तर ह्या तिघा सचिवांनी औपचारिकदृष्ट्या कागद हलवावयास पाहिजेत. नाहीपेक्षा स्वतःचे काही मत असेलच तर उपसमिती जेव्हा निर्णय घेत असते तेव्हा ते मांडून उपसमितीकडून स्वतःच्या मते जो निर्णय योग्य आहे तो मान्य करवून घेणे अपेक्षित आहे. ही योग्य पद्धत जर अंगिकारली तर मग ते सचिव कसले ? आणि हे तिन्ही सचिव तर तामिलसंघाचे सभासद. मग काय विचारता ? सर्व मंत्रिमंडळ म्हणजे एक आलतूफालतूंचा मेळावा. जगात जी काही अक्कलहुषारी, ज्ञान, अनुभव ह्या गुणांची पुंजी ती आमच्या पदरी ! वित्त,

नियोजन, आदिवासी, कला व जगाच्या पाठीवर जे काही आहे त्याचा अर्थ 'आम्हासीच ठावा। तुम्ही भार वाहावा माथा!' आता वित्त व नियोजनसचिवांनी काय केले तर एकाधिकार खरेदीस सध्या एक कोटी घ्या व साठ लाखांसाठी पब्लिक अंडरटेकिंग कमिटीकडे अर्ज दाखल करा असा निर्णय स्वतःच्या अखत्यारीत दिला. आदिवासी कल्याण खात्याच्या सचिवाला तामिलसंघातील ज्येष्ठ सभासदांच्या विरुद्ध जाण्याची हिंमत नाही. आदिवासी कल्याण मंत्र्यांना वेळ नाही. वित्तमंत्री जानव्यात अडकलेले तर दादा तिरपुडे-पवार यांच्या कारवायांनी त्रस्त झालेले. साठ लाख रुपये एकाधिकार खरेदीला त्या वेळेस मिळाले नाहीत. परिणामतः तयारी अपुरी झाली व तिचे पडसाद पुढे काय झाले ते खाली दिले आहेत.

(ब) जेव्हा साठ लाख रुपये मिळाले नाहीत तेव्हा आदिवासी कल्याण सचिवाने एकाधिकार खरेदी करण्यास नेमलेल्या एजंटास (आदिवासी विकास महामंडळ) व्यापारी बँकांकडून पैसा उभारण्यास सांगितले. हे महामंडळ एक सहकारी संस्था असून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेशी संलग्न असल्याने खरेदीस लागणारा सर्व पैसा उभारण्यास योग्य असलेले एकमेव ठिकाण. १९७७–७८ मध्ये जेव्हा शासनाने एकाधिकार खरेदी केली तेव्हा ह्या बँकेने पैसे दिले. असे असूनसुद्धा सचिवांनी व्यापारी बँकांचे दार ठोठावण्यास सांगितले. हा हुकूम अगदी चुकीचा. व्यापारी बँका सरकारी/सहकारी संस्थेस पैसे देण्यास नाखूष असतात. चर्चेचे गुऱ्हाळ लावतात. खोटी आशा दाखवितात; पण पैसा देत नाहीत हा अनुभव. असे असूनसुद्धा सचिवाने असा हुकूम का बरे दिला? पुनश्च तामिलसंघम्. जे तामिळसचिव आहेत त्यांचे आपले एक–स्वतःस फार हुशार समजत असल्याने आपण करू ती पूर्व व मी जे सुचविले ते आधी कोणी सुचविलेच नाही. हुकूम करताना मागचापुढचा विचारच करावयाचा नाही. दुसऱ्याने काही सुचविले तर त्याची व सूचनेची टिंगल करावयाची. एवढे करून जर फलप्राप्ती झाली तर आकाशास गवसणी घातली; पण असे कोठे होते काय? आपल्या आकाशातील बापाने १९७८ सालापूर्वीच नमूद केले आहे की, 'बाबांनो, ह्या तळपत्या सूर्याखाली नवीन असे काहीच नाही.' पण त्याला तामिळसंघातील सभासदांबद्दल अज्ञान होते असे दिसते. आजतागायत एकाही व्यापारी बँकेने एक छदाम दिला नाही. (त्यातील एका बँकेने मात्र आपला फायदा करून घेतला. महामंडळाकडून कर्जाच्या अर्जांची छाननी करण्यास दोन लाख रुपयांची ठेव मात्र उकळली. सहकारी कायद्याखाली असल्या प्रकारची ठेव ठेवण्यास निबंधक सहकारी संस्था ह्यांची परवानगी लागते. असली परवानगी न घेता खाते उघडण्यात आले आहे हे वेगळेच प्रकरण.)

मध्यंतरी शासन बदलले. म्हणजे मंत्री बदलले. दादांच्या शासनाने घेतलेला पुरोगामी निर्णय बदलला तर नवीन शासनावर प्रतिगामीपणाचा ठिपका पडला असता. एकाधिकार खरेदीधोरणात बदल केला नाही. शासनाने साठ लाख रुपय दिले नाहीत. बँकांनी कर्ज दिले नाही. ह्या पार्श्वभूमीवर एकाधिकार खरेदीचा काही भाग आवाक्याच्या बाहेर जाण्याची परिस्थिती निर्माण झाली. ठाणे जिल्ह्यात गवताचा फार मोठा व्यापार चालतो. आदिवासींच्या जमिनीवर गवत उगवते; पण फायदा व्यापारी लुटतात. ह्या जिल्ह्यातील आदिवासी विभागातील गवत एकाधिकाराखाली आणावयाचे हे आधी ठरलेले; पण सचिवांच्या वर सांगितलेल्या कामाच्या पद्धतीमुळे ही खरेदी फक्त पालघर तालुक्यातच करावयाची असे ठरले. हे ठरले तर ठरले; पण त्याची काही व्यवस्था? काही नाही. व्यापाऱ्यांनी मे १९७८ मध्येच गवताची वने त्यांच्या मालकांपासून विकत घेतली व कापणीसाठी मजुरांना मजुरीचे पैसे आधीच देऊन ठेवले. तसेच गवताच्या कापणी व गासड्या बांधणीसाठी लागणारी अवजारे तेलपाणी करून तयार ठेवली. पालघर तालुक्यातील १४१ गावांत जेव्हा खरेदी घोषित करण्यात आली तेव्हा कापणीसाठी मजूर मिळेनात. कारण त्यांच्याजवळचा पैसा संपला होता. गवत जागच्या जागीच वाळावयास लागले. तेव्हा मग आरडाओरड झाल्याने शासनाने खावटी-कर्ज देण्याचा हुकूम काढला; पण पुढचे काय? आजतागायत पाडा प्रेसचा पत्ता नाही व व्यापाऱ्यांजवळ असलेली ही अवजारे ते भाड्याने देण्यास तयार नाहीत. आता शासनाने साठ लाख रुपये मंजूर केले आहेत; पण काहीही कारण नसताना एवढ्या विलंबाने. आज पालघरमधील खरेदीसाठी निर्माण केलेल्या यंत्रणेत जी दुर्बलता व कमतरता आढळते त्यास जबाबदार कोण?

आमच्या मते ह्या सर्वास मंत्रालयातील तामिलसंघम जबाबदार आहे. चार-पाच महत्त्वाच्या खात्यांचे सचिव दाक्षिणात्य आहेत. ह्यात हरकत घेण्यासारखे काहीच नाही; पण जर जबाबदारीने कामे केली तर. जबाबदारीने काम करण्याची रीत वर नमुन्यादाखल दिलीच आहे. वर दाक्षिणात्य शब्द वापरल्याने संकुचित मनोवृत्ती इत्यादी विशेषणे वापरली जातील; पण त्यास आम्ही पात्र नाही. शासनकर्ते ह्या लोकांच्या कारवायांकडे लक्ष देत नाहीत. जेव्हा त्यांच्या कारवाया शासनकर्त्यांसमोर येतात तेव्हा शासनकर्त्यांना त्या समजत नाहीत. तामिलसंघममधील एकाने तर चक्क जागतिक बँकेच्या मॅक्नामारा ह्यांच्या पुढे रोजगार हमी योजनेसाठी विदेशी चलनात कर्ज मागितले. जसे काही रोजगार हमीतील वेतन विदेशी चलनात द्यावे लागते!! मॅक्नामारांनी समर्पक उत्तर दिलेच आहे; पण ज्यांनी बोध घ्यावयाचा त्यांनी बोध घेतला की नाही कोण जाणे.

आम्ही जरा कान व डोळे उघडे ठेवून वावरतो. असे म्हणतात की, एका परदेशीय वार्ताहराने ह्यांच्यापैकी एकास आपण महाराष्ट्रीय आहात का म्हणून विचारले असता त्यांनी चक्क नाही म्हणून सांगितले! एकूण सर्वच विचित्र. मंत्रालयातील तामिलसंघम् मात्र बळावतो आहे.

**—मंत्रालयातील कुणी एक**

# कोंडीत सापडलेल्या वैज्ञानिकांसाठी...

अरुण देशपांडे

सध्याच्या समाजव्यवस्थेत प्रामाणिक, धडपडणारे वैज्ञानिक व तंत्रज्ञ यांची सर्व बाजूंनी कोंडी झाली आहे. ती आर्थिक, मानसिक, सामाजिक अशी सर्व बाबतीत आहे. त्यामुळे अशा अनेकांना खोलवर वैफल्य येते. त्या वैफल्यातून काही वैज्ञानिकांनी आत्महत्या करून 'सुटका' करून घेतली; पण आत्मघात करून प्रश्न सुटत नाहीत. माझेच उदाहरण घ्या ना! मी एक अॅग्रिकल्चरल ग्रॅज्युएट; पण इमानेइतबारे चाकोरीबद्ध नोकरी करण्यात मन रमेना. लहानपणापासूनची संशोधक, प्रयोगात्मक वृत्ती गप्प बसू देईना. मी एक पिकांवर फवारे मारण्याचे, बैलगाडीच्या शक्तीवर चालणारे यंत्र शोधले. अनेकांनी त्याची खूप वाहवा केली; शोधाला पुण्यातील सुप्रसिद्ध असे पारखे पारितोषिकही मिळाले. म्हणून उत्साहाने त्याचे कमर्शिअल पातळीवर उत्पादन करून गावोगावी विकायचे ठरविले; पण बड्या कंपन्यांनी व इतर संबंधित बड्यांनी माझी कोंडी केली. काहींनी फसविले. शेवटी सुमारे एक लाखाचा कर्जाचा डोंगर डोक्यावर घेऊन मी उभा आहे; पण नाउमेद होऊन, डोक्यात राख घालून चालणार नाही हे मी ठाम ठरविले. इतर कोंडीत सापडलेल्या वैज्ञानिकांशी बोललो, इतर मित्रांशी बोललो व त्यातून आम्हाला एक मार्ग दिसू लागला आहे. त्यासंबंधी काही विचार व प्रयत्न सुरू केले आहेत. त्याची माहिती देण्याचा हा प्रयत्न—

मला साधारणपणे खालील प्रकारचे वैज्ञानिक आणि तंत्रज्ञ भेटतात—

१) असे वैज्ञानिक आणि तंत्रज्ञ की ज्यांनी नोकऱ्या न करता स्वतःचे संशोधन स्वतःच्या लघुउद्योगामार्फत बाजारपेठेत आणण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी बँका आणि इतर अर्थसंस्थांकडून कर्ज (अर्थसहाय्य नव्हे) घेऊन त्यांनी हे उद्योग सुरू केले. विशेषतः बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर; परंतु त्यांना बाजारपेठी स्पर्धेत दारुण अपयश आले. त्यांची बँकांकडून, सरकारी यंत्रणांकडून, भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांकडून, तसेच बाजारपेठेतील बड्यांकडून पद्धतशीर कोंडी करण्यात आली. काहींना तर अक्षरशः अन्नान्नदशा प्राप्त झाली. बँकांनी कर्जासाठी असह्य दडपण आणले, लिलाव पुकारले. (ह्याच बँका बड्या धेंडांपुढे पटापट नांग्या टाकतात!) प्रतिष्ठा धुळीला मिळाली. मित्र, नातेवाईक इत्यादींनी फारशी साथ दिली नाही.

यातील काही लोकांनी आपले आवडते संशोधनक्षेत्र सोडून देऊन ज्यात लगेच नफा मिळेल असे उत्पादन सुरू केले व स्वतःला तगवले. उदा० माझ्या एका मित्राने सोपी, शेतीची अवजारे शोधून त्यांचे उत्पादन करायचे हे सोडून देऊन उच्चमध्यमवर्गीयांना लागणारे स्वयंपाकघरातील फर्निचर तयार करण्यास सुरुवात केली. दुसऱ्या एका मित्राने आपले आवडते क्षेत्र सोडून मुकाटपणे एका बड्या कारखानदाराचे दास्यत्व स्वीकारले आणि आपली बुद्धी, शक्ती त्याच्या पायी वाहिली! त्या वेळी त्याच्या मनाची जी तडफड झाली ती वर्णनाच्या पलीकडची आहे. हा चक्क वेश्याव्यवसाय आहे, हे त्याचेच शब्द आहेत!

२) खाजगी वा सरकारी संशोधनसंस्थांत काम करणाऱ्या, संशोधनाबद्दल खरोखर आस्था असणाऱ्यांचीही फार कुचंबणा होते. खाजगी क्षेत्रातील संशोधन हे बरेचसे वरवरचे, मालाला आकर्षक बनविणारे, फक्त नफ्याकडे डोळा ठेवून असणारे असते. कित्येकदा 'संशोधन आणि विकास' हा विभाग हा नुसता शोभेसाठी, आयकरविभागाच्या डोळ्यात धूळ फेकणारा असतो. (नाही तर बॉलपेन, आइस्क्रीम इ. गोष्टींसाठी परकीय तंत्र आणले गेले नसते.) सरकारी संस्थेत मठ्ठ नोकरशाही मख्खपणे तळमळीच्या संशोधकांना नाउमेद करीत असते. करिअरिस्ट चाकरांच्या घोळक्यात सरकारी संशोधन संस्थांतील सच्च्या संशोधकांचे खच्चीकरण होते. विभाग-प्रमुखाने चांगल्या संशोधकाला निरनिराळ्या मार्गांनी दडपणे वा त्याचे संशोधन स्वतःचे म्हणून खपविणे हे सर्वांत मानहानिकारक प्रकार बिनबोभाटपणे चालत असतात. या प्रकाराला कंटाळून काही वैज्ञानिक परदेशात निघून जातात.

३: मला आणखी एक महत्त्वाचा पण सर्व बाजूंनी दुर्लक्षिलेला, सुप्तावस्थेतील वैज्ञानिक-तंत्रज्ञांचा थर दिसतो, ज्याला रूढ अर्थाची शैक्षणिक पात्रता नाही. मला हा वैज्ञानिक-तंत्रज्ञ कारखान्यात यंत्रांवर काम करताना दिसतो, प्रयोगशाळेत साहाय्यक म्हणून, शिपाई म्हणून काम करताना आढळतो. आज तो शेती संशोधन केंद्रातून काम करणारा शिपाई आहे किंवा एखादा मिस्त्री, सुतार, लोहार, टर्नर, फिटर आहे. स्कूटर-मोटरच्या दुरुस्ती-दुकानातही तो तुम्हाला भेटेल. आज त्याची संशोधकवृत्ती मारली जाते आहे, एवढेच नव्हे तर त्याची अमानुष पिळवणूक चाललेली आहे. त्यांना आपली दुःखे शब्दातून नीट मांडतादेखील येत नाहीत. त्यांची 'भाषा'च अजून लिपीबद्ध व्हायची आहे!

वरील सर्व वैज्ञानिक आणि तंत्रज्ञांची जरी कोंडी झाली असली तरी ते सध्या एकाकीपणे लढत आहेत आणि पराभूत होऊन नामशेष होत आहेत. मध्यमवर्गीय आत्मकेंद्रितपणा हा त्यांचा मोठा दोष आहे. त्यामुळे त्यांच्यासारख्या इतर वैज्ञानिकांना बरोबर घेऊन एकत्रितपणे मार्ग काढण्याचा ते विचार करीत नाहीत.

सहा महिन्यांपूर्वी माझा बाबा आमटे ह्यांच्याशी संबंध आला. उपेक्षितांचे अंतरंग त्या माणसाला समजले आहे. समाजाने अस्पृश्यांहून अस्पृश्य मानलेल्या, कुष्ठरोग्यांमध्ये त्यांनी आत्मविश्वास फुलवला. कर्जबाजारी झाल्यावर मीही वाळीतच पडलो होतो. तेव्हा बाबांच्या 'आनंदवन'ने मला व माझ्या कुटुंबाला आधार दिला. मनःशांती

मिळवून दिली. माझ्यातील मरू घातलेल्या संशोधकाला संजीवन दिले. मला माझा आत्मविश्वास परत मिळाला. लढा देण्यासाठी मी सिद्ध झालो.

सोमनाथ प्रकल्प–अनेक सामाजिक कार्यकर्त्यांची बॅटरी चार्ज करून देणारे पॉवर-स्टेशन ! तेव्हा एका नव्या चळवळीची, संघटनेची सुरुवात येथूनच व्हावी यात नवल ते काय ! बाबा मला म्हणाले, ' तुझ्या ह्या वैज्ञानिकांना आणि तंत्रज्ञांना कुठे एकत्र जमायला जागा नसली तर ही जागा आहे. उपेक्षितांनी निर्माण केलेले सुंदर जग तुम्हा उपेक्षित वैज्ञानिकांना आत्मविश्वास देईल ! '

' फोरम फॉर डिस्ट्रेस्ड् सायंटिस्टस् ' या संघटनेत आपण एकत्र येऊन विचारविनिमय करून पुढचा मार्ग शोधला पाहिजे. आमच्या डोक्यात काही ठोस कल्पना आहेत; पण त्या सविस्तरपणे, प्रत्यक्ष भेटीतच मांडता येतील. याच संघटनेची विधायक बाजू म्हणून ' सामाजिक न्यायासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान ' ही चळवळ उभारायची आहे. आजच्या समाजव्यवस्थेत तळच्या वर्गाला विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा फायदा मिळत नाही. तो कसा मिळेल याबाबत विचार आणि कृती आपण करणार नाही तर कोण करणार ? उपेक्षितांसाठी उपेक्षितच जिकिरीने लढतात. त्यासाठी एक विज्ञान-केंद्र व टेक्नॉलॉजी बँक सोमनाथला व्हावी अशी बाबांची व इतर कार्यकर्त्यांची इच्छा आहे–स्वप्न आहे.

ज्या वैज्ञानिक-तंत्रज्ञांना वरील कोंडी फोडायची आहे, आपला मध्यमवर्गीय आत्मकेंद्रितपणा सोडून देऊन संघटित व्हायचे आहे, आपला लढा इतर सामाजिक न्यायासाठी चाललेल्या लढ्याशी जोडायचा आहे अशा जिगरवाल्या दोस्तांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा–अरुण देशपांडे, प्रति–बाबा आमटे, सोमनाथ प्रकल्प, व्हाया मूल. जि. चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य. [ फोन क्र. १०–मूल ]

मी व माझे काही मित्र गेले सहा महिने या संघटनेच्या कामात आहोत. आतापर्यंत भारतभर चांगला प्रतिसाद मिळाला आहे; पण अजून ही संघटना खऱ्या अर्थाने फोफावली पाहिजे. मी या संघटनेचा पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काम करण्यास तयार आहे.

आपले पत्र सविस्तर असावे. त्यात आपला पूर्ण परिचय, (अगदी कौटुंबिक पार्श्वभूमीसहित) झालेली कोंडी कशा प्रकारची आहे, ती फोडण्यासाठी काय प्रयत्न केले, त्यातील अनुभव व सध्याची परिस्थिती इ. सविस्तर माहिती असावी. आपल्यासारख्या वैज्ञानिकांचे पुनर्वसन व्हावे असे आपल्याला वाटते, ह्याबद्दलच्या आपल्या कल्पना मांडाव्यात. आपण अशा संघटनेसाठी काय काम कराल, संघटनेची कार्यपद्धती कशी असावी, संघटनेची आर्थिक बाजू कशी संभाळली जावी याबद्दल आपली मते सविस्तरपणे कळवावीत.

डिसेंबरमध्ये संघटनेच्या कामाची काही जबाबदारी घेऊ शकतील अशा निवडक कार्यकर्त्यांचा मेळावा सोमनाथ येथे घेण्याचे ठरत आहे. यात आपण भाग घेऊ शकाल काय ? कशा प्रकारे ? याचेही विवेचन असावे. संघटना लोकशाही पद्धतीने काम करील, ती एकखांबी तंबू होणार नाही याची खबरदारी आपण सर्वांनीच घेतली पाहिजे.

तर आपल्या प्रतिसादाची वाट पाहत आहोत ! □

# सूर व सुरू यांनी नटलेले संमेलन

मधुकर ना. गोगटे

विज्ञान हा एक रुक्ष विषय आहे असा एक समज आहे. विज्ञानात किचकट गणिते, किचकट फॉर्म्युले, किचकट लॅटिन नावे असतात व वैज्ञानिकांचे मेळावे म्हणजे मख्ख चेहेऱ्याच्या चिंतातुरांची चर्चा असे मानले जाते ! पण मराठी विज्ञान परिषदेतर्फे दर वर्षी भरणारे विज्ञान-संमेलन हे या प्रकारे गंभीर वृत्तीचे मुळातच नसते. या संमेलनातून वैज्ञानिकांप्रमाणे सामान्य जनही असतात व सारा कारभार खेळीमेळीचा असतो. नुकतेच म्हणजे ११, १२, १३ नोव्हेंबर रोजी चिंचणी (जिल्हा ठाणे) येथे झालेले तेरावे मराठी विज्ञान संमेलन हे विशेषच सुरस ठरले व आजपर्यंत झालेल्या संमेलनांत अग्रेसर अशी त्याची अनेकांनी भलावण केली.

चिंचणी येथील के. डी. हायस्कूलला समुद्रकिनारा लाभला आहे. त्या किनाऱ्यावर शाळेच्या विद्यार्थ्यांनी सुरु झाडांचे आकर्षक उपवन निर्माण केले आहे. या सुरु झाडांच्या सान्निध्यात एक हजार श्रोत्यांची सोय असलेला मंडप बांधण्यात आला होता. या कार्यक्रमांनी मंडप जवळजवळ भरून जात असे. १२ तारखेला डॉ. जयंत नारळीकर यांच्या ' उडत्या तबकड्या ' या भाषणाच्या वेळी मंडपाच्या बाहेरही शेकडो लोक उभे होते. आपल्या भाषणात डॉ. नारळीकर यांनी सांगितले की, उडत्या तबकड्या हा एक लोकभ्रम आहे व कित्येक तथाकथित विज्ञाननिष्ठ लोक या भ्रमात मशगूल होतात हे आश्चर्य आहे ! बरेचदा दृष्टिभ्रम होऊन उडती तबकडी पाहिली असा दावा करण्यात येतो. कोट्यवधी किलोमीटर अंतरावरून पृथ्वीवर तबकडी येणे हे खगोलशास्त्र व संख्याशास्त्र यानुसार संभवनीय नाही व त्यासाठी लागणारी ऊर्जा व तंत्रज्ञान इतके उच्च दर्जाचे लागेल की त्या दृष्टीने तबकडी हे वाहन अगदीच निकृष्ट असेल !

याअगोदर प्रा. रा. वि. सोवनी व गायिका श्रीमती निर्मला गोगटे यांनी ' मानवी आवाजाचे संवर्धन ' यावर भाषण व प्रात्यक्षिक दिले. हा कार्यक्रम सूरयुक्त झाला व त्यामुळे संमेलनाला भलतीच रंगत चढली. गायकांनी आपला आवाज कसा सुधारावा (व्हॉइस कल्चर कसे करावे ) यावरील शास्त्रीय माहिती ऐकून श्रोते मंत्रमुग्ध झाले. उदाहरणार्थ, एका चमच्यासारख्या साधनाने जिभेला मागे रेटले तर जिभेमागील श्वासनलिकेची रुंदी वाढते व आवाजास घुमारा येतो असे प्रशिक्षण, नव्हे अशी तपश्चर्या केल्याने आवाज अधिक सुरेल व कसदार बनतो. त्यासाठी श्वसनाचे व्यायाम व अन्यही साधना आवश्यक आहे.

त्याअगोदर सागरी संपत्ती या विषयावर एक परिसंवाद झाला. सागरी तीरावरील संमेलनास तो शोभेसा विषय होताच, त्याशिवाय त्यातील तज्ज्ञही दर्दी होते व त्यांनी श्रोत्यांना विपुल माहिती दिली. दोन रात्री वैज्ञानिक गप्पाही झाल्या व त्यांनी संमेलन दिलखुलास करून टाकले !

आता हे वर्णन उलटया दिशेने होत गेले ! संमेलनाची सुरुवात झाली ११ नोव्हेंबरला दुपारी २ वाजता. नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे निवृत्त संचालक डॉ. बा. द. टिळक यांनी अध्यक्षीय भाषण केले. त्यांचा विषय होता ग्रामीण विकासासाठी विज्ञान. चिंचणी हे खेडे असल्यामुळे हा विषय श्रोत्यांना जिव्हाळयाचाच होता. ग्रामीण विकासासाठी कल्पना आहेत, पैसा आहे; पण कार्यकर्ते नाहीत अशी खंत अध्यक्षांनी सांगितली. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. राम जोशी यांनी संमेलनाचे उद्घाटन केले. काही नामवंत वैज्ञानिकांचा सन्मान करण्यात आला. पुण्यातील 'विज्ञानयुग' मासिकाचाही या वेळी सत्कार करण्यात आला. मिरची या विषयावर शेतकऱ्यांसाठी एक शिबिर घेण्यात आले.

१३ तारखेला तारापूर येथील अणुशक्ति-केंद्रास प्रतिनिधींनी भेट दिली.

अशा रीतीने हे संमेलन माहितीपूर्ण व मनोरंजक झाले. संमेलनाचे पडसाद ठिकठिकाणी वृत्तपत्रात पडले. तिन्ही दिवस संमेलनातील प्रदर्शनांना भाऊगर्दी होती. वैज्ञानिक व सामान्यजन यांमधील दुवा ही संमेलनाची भूमिका या संमेलनाने १०० टक्के बजावली. संमेलनाने एक ठराव करून बुद्धिवादाचीही चुणूक दाखवली. मध्यंतरी मुंबई हायकोर्टाचे एक न्यायमूर्ती परदेशात मरण पावले तेव्हा दोन दिवस हायकोर्ट व न्यायालये बंद ठेवण्यात आली व हजारो मनुष्यतास फुकट गेले ! या उलट होमी भाभा निवर्तले तेव्हा श्रद्धांजलीसाठी पाच मिनिटे अणुशक्ति-कार्यालय बंद होते. याचा दाखला देऊन ठराव झाला की, थोर लोकांच्या निधनासाठी दिवसभर सुट्टी देऊ नये, पाच मिनिटांची श्रद्धांजली पुरे. मरण पावलेली व्यक्ती ही देखील उद्योगी म्हणून प्रसिद्ध असते व दिवसभर सुट्टी देऊन उत्पादनात खंड पाडणे गैर आहे.

विज्ञानप्रेमी लोकांनी मराठी विज्ञान परिषद, चौथा मजला, ताडदेव एअरकंडिशंड मार्केट, मुंबई ३४ येथे संपर्क साधावा अशी विनंती आहे. पुढील संमेलन बडोदे येथे होणार आहे. ☐

## पुस्तके : साभार पोच

**१. चंद्रपालखीची वाट** (काव्य)
सौ. उज्ज्वला केळकर
व्यासपीठ प्रकाशन, सांगली
पृष्ठे : ७६, मूल्य : सहा रुपये.

**२. सधनाची संगत सोड रे**
( सामाजिक राजकीय वग )
–श्री. भास्कर जाधव
ग्रामीण श्रमिक प्रकाशन,
अहमदनगर
पृष्ठे : ३६, मूल्य : पंचाहत्तर पैसे.

**३. आंबेडकरी जलसे**
स्वरूप व कार्य
–श्री. भीमराव करंडक
अभिनव प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : २०४, मूल्य : बारा रुपये.

**४. ठिणगी** (काव्य)
–श्री. रविचन्द्र हडसनकर
अभिनव प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : चाळीस, मूल्य : सात रुपये

**५. रात्र लहान झाली**
–श्री. विजय तरवडे
आराधना पब्लिकेशन्स, पुणे
पृष्ठे–१०८ मूल्य : साडेसात रुपये.

## आपल्या दीपावली शुभेच्छांबद्दल मनःपूर्वक धन्यवाद

- वाय्. एल्. थत्ते आणि कंपनी, पुणे.
- स्टुडिओ अस्कारा, पुणे.
- रचना प्रॉडक्टस्, पुणे.
- रावीळ पब्लिकेशन, सातारा.
- सुपर ड्रायक्लीनर्स, सातारा.
- एस्के इंजिनिअर्स, पुणे.
- संदेशकुमार भंडारी, पुणे.
- संकेत इलेक्ट्रिकल्स, नासिक.
- सा इंजिनिअर्स अँड फौंड्री प्रा. लि., पुणे.
- फ्रीज क्राफ्ट, पुणे.
- स्वस्तिक ट्रेडर्स, पुणे.
- दीनदयाळ रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे.
- नांदेड न्यूजपेपर एजन्सी, नांदेड.
- अग्रवाल न्यूज एजन्सी, मूर्तिजापूर.
- पवार–वाबळे अँड असोसिएटस्, डोंबिवली.
- महाराष्ट्र स्टेट फिनान्शिअल कार्पोरेशन, मुंबई.
- भार्गव रोलिंग शटर्स अँड स्ट्रक्चरल वर्क्स, लातूर.
- मधुवन पिकनिक सेंटर, मुंबई.
- निशिकांत मिरजकर, दिल्ली.
- कार्यकारी संचालक, ग्राहक पेठ, पुणे.
- अवंती फर्निचर्स अँड डेकोरेटर्स, पुणे.
- प्रशांत न्यूज एजन्सी, औरंगाबाद.
- यू. के. पेपर मार्ट, मुंबई.
- बिल्ड क्विक कॉन्ट्रॅक्टर्स, मुंबई.
- मा. अण्णा जोशी, पुणे.
- मे. वखारिया न्यूज पेपर एजन्सी, ओतूर.
- स्वान ट्रेडर्स, कोल्हापूर.
- श्री. मनोहर कुलकर्णी, नासिक.
- डॉ. य. म. बर्वे आणि कुटुंबीय, नांदगाव.
- अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, पुणे.
- जिल्हा कृषि औद्योगिक सेवा सहकारी सोसायटी लि., नासिक.
- स्टुडिओ पार्कसन, पुणे.
- रंगरेखा आर्ट वर्क्स, पुणे.
- हॉटेल पथिक, पुणे.
- रायकर प्रिंटर्स, गोवा.
- श्री. के. बी. गुजराथी, वापी.
- संगम प्रेस, पुणे.
- श्री. गोपालजी ठक्कर, पुणे.
- मे. एकवीरा न्यूज एजन्सी, लोणावळा.
- श्री. श्याम भिडे, डोंबिवली.
- श्री. विनय सहस्रबुद्धे, मुंबई.
- श्री. व सौ. एस्. बी. पटवर्धन, पुणे.
- श्री. रा. धों. जोगळेकर.
- श्री. व सौ. आनंद, बागलकोटे.

'माणूस' परिवार

परिश्रमांची पराकाष्ठा

# राजा केळकर संग्रहालय

श्री. दिनकर गंगाधर केळकर ऊर्फ काका केळकर यांच्याशी गप्पा मारणे हा एक आगळा आनंद असतो. या गप्पा एकतर्फीच असतात, म्हणजे काका एकदा बोलायला लागले की मग आपल्याला बोलावंसं वाटतच नाही. ते बोलत राहतात...जुन्या आठवणी, नवनवीन कल्पना...वेळ पुरत नसल्याची खंत, आज यांना भेटायचंय, तर उद्या त्यांच्याकडील वाद्यं बघायचीयेत...नानाविध गोष्टी ते बोलत रहातात.

पुण्याच्या मध्यवर्ती जागी असलेलं राजा दिनकर केळकर संग्रहालय पाहिलं की, आपण थक्क होऊन जातो. शेकडो, हजारो जुन्या पुराणकालीन वस्तूंचा हा संग्रह फक्त एकट्या माणसाने उभा केला असेल यावर विश्वास बसत नाही; पण काकांची जिद्द दांडगी ! खरं तर दांडगी हा शब्दही अपुरा आहे. गेली चाळीस वर्षं अव्याहतपणे हा संग्रह वाढविण्यासाठी ते भारतभर हिंडताहेत. अजूनही हिंडून वस्तू गोळा करण्याची त्यांची उमेद खरोखर वाखाणण्यासारखी आहे.

हे कर्तृत्व जरी असलं तरी त्याचबरोबरीनं काकासाहेब 'कवि अज्ञातवासी' या नावानं कविताही लिहीत असत. १९१५–२० च्या सुमारास 'मनोरंजन'सारख्या अग्रगण्य मासिकात त्यांच्या कविता छापून येत. ते ऐतिहासिक कविता लिहीत असत. कै. राम गणेश गडकरी त्यांना शिकवत होते. त्यांच्या कवितांवर कवि विनायकांच्या कवितेची छाप आहे. कै. आचार्य अत्रे, महाराष्ट्र-कवि यशवंत यांच्यासारख्या मंडळीत त्या वेळी काका आनंदानं रमत असत.

या संग्रहालयाची कल्पना कशी काय सुचली यावर काकांनी गमतीनं उत्तर दिलं, 'मी पूर्वी चष्म्यांचं दुकान चालवीत होतो. लोकांना दृष्टी देत होतो; पण एकदा एक चष्मा असा हाती आला की, त्यातून मला शेकडो वर्षांच्या मागील गोष्टी दिसू लागल्या आणि त्यातून मला प्रेरणा मिळाली !' काका उत्तर देताना फार चोखंदळ असतात. खूप खोदून विचारल्यावर मग त्यांनी उत्तर दिलं,

'विसाव्या शतकाच्या सुरुवातीची गोष्ट. पुण्यामध्ये गावात व कँपमध्ये आम्ही चष्म्याची दोन दुकानं उघडली. गावातील दुकान माझे डॉक्टरबंधू चालवत असत व कँपमधील दुकान मी स्वतः चालवत होतो. त्या काळी पुण्यात केळकर व अभ्यंकर या दोघांचीच दुकानं होती. कँपमधील माझ्या दुकानात आचार्य अत्रे, रविकिरण मंडळातील कविमित्र जमायचे. त्याचबरोबर सरदार पटवर्धन हेही त्या दुकानात वारंवार येत असत. सरदार पटवर्धन म्हणजे पेशव्यांचे वंशज. ओळख झाली...त्या वेळी मी एक मोटारही खरेदी केली होती. मी एकदा सहज सरदार पटवर्धनांच्या घरी गेलो तेव्हा मला अनेक जुन्या वस्तू दिसू लागल्या. ज्या झोपाळ्यावर मी बसलो होतो (तिथे खुर्च्या नव्हत्या !) त्याच्या नक्षीदार कड्या, नक्षीदार कमानी, छत यांबद्दल मला आकर्षण वाटू लागलं. बरं, सरदार पटवर्धनांकडे अशा वस्तूंचाच भरणा. त्यामुळे मी पुढे पुढे त्यांच्याकडे या वस्तू पाहण्यासाठीच केवळ जाऊ लागलो. पटवर्धनांनीही काही वस्तू दाखवल्या; पण त्या ते मला देऊ शकत नव्हते आणि मला तर मनातून असं वाटत होतं की, अशा वस्तू आपल्याही घरी असाव्यात...पटवर्धनांनी मला एक चित्र बक्षीस दिलं. मग मी त्या वस्तूंचा ध्यासच घेतला. जुने बाजार पालथे घालू लागलो. अशा नक्षीदार, कोरीव वस्तू मोडीच्या भावात घेऊ लागलो. मोडीची दुकानं शोधत हिंडू लागलो. खूप पायपीट केली आणि हळूहळू संग्रह होऊ लागला. त्या वेळी मोडीचा भाव चार–सहा आणे किलो होता.

काकांनी आपलं सर्वस्व अर्पून हा संग्रह तयार केला. त्यांचे दिवंगत चिरंजीव राजा याच्या स्मरणार्थ हे संग्रहालय त्यांनी उभं केलं आणि संग्रहालयाला नाव दिलं–' राजा दिनकर केळकर संग्रहालय. '

काकासाहेब सांगतात, 'या माझ्या संग्रह करण्यात सर्वांत जास्त मदत जर कुणाची झाली असेल तर ती म्हणजे माझी पत्नी–कमलाबाईची. त्यांनी या कार्याला आपलं जीवनच वाहिलं आहे. घरी येणारा प्रत्येक जण त्यांच्या आदरातिथ्यानं भारावून जातो.' आपल्या पत्नी कमलाबाईंबरोबरच भाऊ डॉ. भास्करराव, आई, मुलगी यांचाही काका आदराने उल्लेख करतात.

या संग्रहालयातल्या वस्तू गोळा करताना काकांनी फार मोठे त्रास सोसले आहेत. जिवाहून प्यारी अशी वस्तू मिळविण्यासाठी नाना तऱ्हेचे प्रयत्न काकांनी केले आहेत. संग्रहालयाची ही इमारत बांधताना अनेक वेळा बदल करावे लागले. मस्तानीमहाल, निरनिराळ्या कमानी, टेबलं, खुर्च्या, आसनं यांनी भरलेलं हे संग्रहालय. तिथं वावरताना 'त्या काळाचा' भास झाल्याशिवाय राहात नाही. निरनिराळे पलंग, आरसे, सौंदर्यप्रसाधनांची टेबलं, झुंबरं...आरसे तर महाप्रचंड! मस्तानीमहालातल्या आरशात पाहिल्यावर आपल्यालाच लाज वाटते इतका तो सुंदर आरसा !

दिनकरराव आज ८३ वर्षांचे आहेत. त्यांची उमेद अजूनही दांडगी आहे. शंतनुराव किर्लोस्कर, साहित्यिक मुल्कराज आनंद यांचे श्रम ही संस्था मोठी होण्यामागे आहेत. चार वर्षांपूर्वी केळकरांनी ही स्वतःची मालमत्ता सरकारजमा करून टाकली. हे औदार्य केवळ अतुलनीय आहे ! काकांवर सगळेच जण प्रेम करीत आले आहेत. त्या प्रेमामुळे त्यांची उमेद वाढते.

श्री. मुल्कराज आनंद यांनी केळकरांना बोलावून सांगितलं की, '१९८० साली जर्मनीमध्ये लोककलांचे प्रदर्शन होणार आहे. त्यात भारताचं प्रतिनिधित्व करण्यासाठी मी तुमचं नाव सुचविलं आहे.' काकांनी पुन्हा उभारी मारली. आता ते वेळ पुरत नाही म्हणून तक्रार करताहेत. 'जर्मनीमधील प्रदर्शनात मी फक्त आदिवासी स्त्रियांच्या फण्या गोळा करून मांडल्या तरी मी प्रदर्शन जिंकीन असा माझा विश्वास आहे !' काकांचे हे शब्द आत्मविश्वासाने भरलेले असतात. आता त्यासाठी ते आदिवासी भागातून हिंडणार आहेत.

काकांना पुणे विद्यापीठाने डी. लिट्. पदवी देऊन त्यांचा सन्मान केला. शंतनुराव किर्लोस्कर, मुल्कराज आनंद यांसारख्या त्यांच्या मित्रांनी त्यानिमित्त एक मोठा महोत्सव पुण्यात

घडवून आणला. त्या महोत्सवाच्या समारोपप्रसंगी श्री. केळकर म्हणाले, "मी आज ८३ वर्षांचा झालो असलो तरी मी माझे वय तीस वर्षापूर्वीच विसरून गेलो आहे. रोज नव्या नव्या कल्पना माझ्या डोळ्यांसमोर तरळत असतात आणि या सर्व मोठ्या मंडळींच्या सहाय्याने मी त्या उभारू इच्छितो. अजूनही माझ्या डोळ्यांपुढे दोन फार मोठ्या कल्पना आहेत. त्यातील एक आहे वाद्यांसंबंधी. हा संग्रह जरी फार मोठा आहे तरी देखील तो प्रातिनिधिक स्वरूपाचा करावयाचा आहे व तो मला केलाच पाहिजे!

दुसरा जो अपूर्व संग्रह उभा करण्याची मी जिद्द धरली आहे तसा संग्रह जगात कोठेही नसावा, अशी ग्वाही मला जाणकार देतात. हा संग्रह निर्माण झाला तर, ते एक या मोठ्या हिंदुस्थानचे वैभव समजले जाईल. येथील भारतीय स्त्रियांचे वैभव हे त्यांच्या अतिसुंदर तांब्या–पितळेच्या भांड्यांत नाही, त्यांच्या विविध प्रकारच्या वस्त्रांत नाही, त्यांच्या बहुमोल दागिन्यात तर नाहीच नाही, तर आपल्या देशासाठी, घरासाठी, कुटुंबातील सर्व व्यक्तींसाठी करीत असलेल्या आत्मयज्ञात साठवलेलं आहे. म्हणून मला या भारतीय स्त्रियांच्या अफाट वस्तुसंग्रहामागील भारतीय स्त्री दाखवावयाची आहे. हे दाखविणे कठीण आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. ही स्त्री उभी करताना स्त्रीचे अंतःकरण आणि तिचे डोळे यांचा विचार हा केलाच पाहिजे. माझी सहधर्मचारिणी–जिनं माझ्या बरोबरीनं ही खडतर तपश्चर्या केली, तिचा या कामातील उत्साह माझ्याइतकाच आहे.

पुणे विश्वविद्यालयाने माझ्या डोक्यावर ठेवलेली डी. लिट्. ची मानाची पगडी मला सतत माझ्या ह्या कर्तव्याची जाणीव करून देत आहे. माझी हितचिंतक मंडळी मी हे काम केलं पाहिजे अशी एक प्रकारची ताकीद मला देत आहे.. आम्ही जे तुझ्यावर प्रेम करीत आहोत ते तू हे काम जिद्दीने करावे म्हणून ! मी याच वेळी त्यांना असे आश्वासन देऊ इच्छितो की, मी त्यांची निराशा करणार नाही–तसे देवही करू देणार नाही असे माझा आतला आवाज मला सांगत आहे! "

संग्रहालयात आपण प्रविष्ट झालो की समोरच अज्ञातवासींच्या पुढील ओळी आपले लक्ष वेधून घेतात.

" भारतीय शिल्पाची दरवळती येथ फुले,
तुजसाठी 'कमलकुंज' उभवून गतकाल झुले
पत्नीचे कन्येचे श्रम येथे ठाई ठाई
या माझ्या पुत्रास्तव–राजास्तव सर्व काही
विसर मला पण न विसर येथिल अमर कला
धुंद करित गतकालिन शिल्प इथे तुजला "


संग्रहालयाच्या भावी योजना अपेक्षा उंचावणाऱ्या आहेत. संग्रहालयशास्त्राचा अभ्यासक्रम सुरू करणे, दृक्–श्राव्य साधनांद्वारे संग्रहालय बोलकं करणं, याबरोबरच मराठा कालखंड, राजस्थान संस्कृती आदींसाठी स्वतंत्र दालनं उभी करून समाजाचं ऐक्य वाढविण्यास मदत करणं, काही कलात्मक वस्तूंच्या प्रतिकृती विक्रीसाठी उपलब्ध करून देणं, या योजना खरोखरच उल्लेखनीय आहेत. त्या योजना सफल होण्यासाठी काका केळकरांना दीर्घायुष्य लाभो हीच सदिच्छा !

**–मुकुंद संगोराम**


हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.

( रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८.)

–डॉ. वा. ना. कुबेर



**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

पुस्तके

# ' मातृके 'च्या निमित्तानं

**पुन्हा एकदा शाश्वताच्या शोधात !**

'मातृका ' ही पु. शि. रेगे यांची चौथी आणि अखेरची कादंबरी. ' सावित्री, ' ' अवलोकिता ' आणि ' रेणू ' ह्या आधीच्या तीन कादंबऱ्या. पंधरा वर्षांच्या ह्या कादंबरी-लेखनातून रेगे यांनी कवितेप्रमाणेच स्वतःचा वेगळा असा ठसा मराठी कादंबरीवर उमटवला. रचना, भाषा, आशय सर्वच दृष्टींनी रेग्यांची कादंबरी अभूतपूर्व महत्त्वाची ठरली आणि म्हणूनच आजच्या जाणत्या समीक्षकांना तिची गंभीरपणे आणि वेगळी अशी दखल घ्यावी लागली. रेग्यांनी रुजवलेला कादंबरीचा हा वेगळा आकृतिबंध ' मातृके ' तूनही प्रकर्षानं प्रत्ययाला येतो. 'अवलोकिते'-तून रेग्यांच्या कादंबरीचं व्यक्तिमत्त्व विशेष सामर्थ्यानं जाणवत नसलं तरी आजच्या ' मातृके 'तून मात्र हे व्यक्तित्व ठळकपणे जाणवत रहातं. सामान्यतः कोणी तरी प्रगल्भ विचारांची, तरल बुद्धीची, सुसंस्कृत वातावरणात वाढलेली आणि स्वतंत्रपणे विचार करणारी तरुण स्त्री रेग्यांच्या कादंबरीच्या केन्द्रस्थानी असते. सावित्री, रेणू किंवा ' मातृके ' तली रमाकाकी आणि सालेहा ह्या स्त्रिया अशाच संपन्न व्यक्तित्वाच्या. त्यातली सावित्री सधन परिस्थितीतली तर रेणू मध्यम परिस्थितीत जन्माला येऊनही दिल्लीतल्या उच्चभ्रू वातावरणाच्या आसऱ्याला आलेली; पण रमाकाकी मात्र सर्वस्वी मध्यमवर्गातच वाढलेली, वावरलेली, वेगवेगळ्या पार्श्वभूमीवर साकारणारी ! ह्या सर्वच स्त्रियांची व्यक्तिमत्त्वं मात्र सारखीच विलोभनीय आणि विचारार्ह आहेत. रेग्यांच्या कादंबऱ्यांतून भेटणाऱ्या स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वातली ही सुसंगती अत्यंत लक्षणीय अशी ठरते.

तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक असणाऱ्या एका जगप्रसिद्ध विद्वानाच्या बुद्धिमान मुलीची म्हणजे सावित्रीची व्यक्तीरेखा रेगे त्यांच्या ' सावित्री ' ह्या कादंबरीत रेखाटतात. तिथे एका प्रगल्भ तरुण मनाची तरल विचार-स्पंदनं ते पत्ररूपानं मांडतात, तर दिल्लीच्या प्रतिष्ठित, उच्चभ्रू समाजात नोकरीच्या निमित्तानं सहजपणे सामील झालेल्या रेणूचं चित्रण ते ' रेणू 'मध्ये करतात. 'मातृके'मध्ये मात्र रेगे प्रामुख्यानं श्याम नावाच्या मध्यमवर्गीय पण बुद्धिमान तरुणाच्या पूर्वायुष्याचं आलेखन करतात.

### समर्थ शैली

रेग्यांच्या कादंबऱ्यांतून विषयांचा फाफटपसारा कधीही प्रत्ययाला येत नाही किंबहुना त्यांच्या कवितेसारखंच त्यांचं हे गद्य लिखाणही अत्यंत आटोपशीर आणि नीटस असतं. नवनव्या पण प्रभावी शब्दांची योजना रेगे त्यांच्या कादंबरीत, कवितेएवढ्या प्रकर्षानं करीत नसले तरी मोजक्या आणि सुटसुटीत वाक्यरचनेतून ते परिस्थितीचा संदर्भ जसा सहजपणे पुढे सरकवत नेतात, तसाच कुठल्या ना कुठल्या विचारांचा आविष्कारही अगदी सहजगत्या करत जातात. रेग्यांचं वैशिष्टय हे की, ते आपल्या लहान लहान वाक्यांवरदेखील वाचकाला थांबवून धरतात, मागे पहायला लावतात आणि विचारही करायला लावतात; त्याचबरोबर त्यामागच्या विस्तृत संदर्भाला आणि अर्थवाही आशयालाही ते शब्दाशब्दातून पुढेही नेत असतात. रेग्यांच्या ह्या समर्थ शैलीचा प्रत्यय ' सावित्री ' पासून ' मातृके ' पर्यंत त्यांच्या प्रत्येक कादंबरीत प्रकर्षानं येतो.

' मातृका ' ही मुख्यतः श्यामची गोष्ट. कोकणातल्या पातोळ्यासारख्या आडगावी, शेणवी सारस्वत पण जमीनदार कुटुंबात जन्मलेला हा एक मुलगा. त्याच कोकणात थोडं-फार बालपण, नंतरचं मुंबईतलं मॅट्रिक-पर्यंतचं शालेय शिक्षण, एलफिन्स्टनमधलं कॉलेजचं आयुष्य आणि ते शिक्षण अचानक अर्ध्यावरच सोडून इराणमध्ये गालीचे खरेदी करणाऱ्या कर्सनदास ह्या भारतीयाच्या कंपनीत पत्करलेली नोकरी, इराणमधल्या त्याच्या वास्तव्याचा काही काळ, ह्या साऱ्यांचंच रेगे सजीव चित्रण करत जातात. ह्या साऱ्याच चित्रणाला एक वेग असतो, आशयालाही ओघ असतो. तरीदेखील एखाद्या व्यक्तिच्या आयुष्यातल्या एका मर्यादित कालखंडाचं सामान्यतः चित्रण करणाऱ्या रेग्यांच्या इतर कादंबऱ्यांच्या तुलनेत हा कालखंडही तसा फार मोठाच वाटतो. किंबहुना काहीसा लांबल्यासारखा दिसतो आणि त्यामुळेच रेग्यांची ही ' मातृका ' कादंबरी ' सावित्री ' ' रेणू ' ह्यांसारख्या इतर कादंबऱ्यांच्या मानानं बरीच विस्तारली आहे. ' रेणू 'मध्ये भारत-पाक युद्धाच्या संदर्भातला म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळ रेगे निवडतात, तर त्यांच्या ' सावित्री ', ' अवलोकिते 'ची कथानकं दुसऱ्या महायुद्धाच्या सुमारास घडतात. ' मातृके 'तही रेगे ह्या स्वातंत्र्यपूर्व काळाचंच जरा विस्तारानं चित्रण करताना दिसतात. स्वाभाविकच भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीची, तिनं जोपासलेल्या विचारधारांची, त्यातून स्वीकारल्या गेलेल्या जीवनप्रणालींची प्रतिबिंबं येथेही उमटताना दिसतात. किंबहुना आधी आपल्या मार्गावर चाचपडणारे आणि नंतर वकिली व्यवसायात पडलेले, मुळात खंदे देशप्रेमी असणारे श्यामचे धाकटे चुलते नाना किंवा गांधीवादी मार्ग अनुसरणारे, स्वभावतः विचारवंत असणारे, श्यामशी तात्त्विक चर्चा करण्यात आनंद मानणारे आणि अखेरी त्याला इराणात नोकरीही मिळवून नवी वाट दाखविणारे, आपल्या आशयघन शब्दांतून त्याला अप्रत्यक्ष मार्गदर्शन करणारे विसूभाऊंसारखे देशभक्त रेग्यांनी ह्या कादंबरीत अगदी प्रभावीपणे रंगविले आहेत.

' मातृके 'ची खरी कथा सुरू होते ती श्यामच्या मुंबईत येण्यानंतर आणि त्याहीपेक्षा त्याची रमाकाकींशी विशेष जवळीक निर्माण झाल्यानंतर. मुळातच बुद्धिमान असणाऱ्या ह्या मुलाच्या व्यक्तिमत्त्वाला उजळा मिळतो तो मुंबईसारख्या शहरात. इथे आपल्या चौकस बुद्धीनं तो असंख्य नवनव्या गोष्टी शिकतो, अनेकांशी जवळीक साधण्यात

सहजपणे यशस्वी होतो. त्यात त्याच्या कॉलेजातले कीर्तने, रुईकरसारखे अभ्यासू मित्र, घरात रमाकाकींसारखी सुजाण स्त्री, बाहेर विसूभाऊंसारखे विचारी देशभक्त अशा विविध वयांच्या आणि विचारांच्या व्यक्तिचा समावेश होतो. त्यातूनच श्यामचं व्यक्तिमत्त्व चौरस होऊन जातं, मनाचा विकास होतो, मुळातल्या स्वतंत्र विचार करण्याच्या प्रवृत्तीला नवी चालना मिळते. श्यामच्या इथवरच्या आयुष्यात तशा अनेक स्त्रिया येतात. त्यात बालपणी सर्वार्थानं त्याला शरीरदर्शन घडवणारी त्याची सोवळी आजी असते, मद्रासला भेटलेली सवनिसांच्या श्रीमंत कुटुंबातली जायू असते; मुंबईला घरापलीकडे रहाणारी विलक्षण रूपवान पण अकाली मृत्युमुखी पडलेली कस्तुर असते; कॉलेजात भेटलेली मग मार्क्सवादी विचारांनी प्रेरित होऊन तेलंगणाच्या लढ्यात तुरुंगवास पत्करणारी नीला देसाई असते. ह्या सर्वच स्त्रियांचे संदर्भ ह्या कादंबरीत वरचेवर येत असले तरीही त्या श्यामच्या आयुष्याच्या संदर्भात तशा उपऱ्याच रहातात. श्यामची सर्वार्थानं जवळीक साधली जाते ती आधी रमाकाकींशी आणि मग इराणात सालेहाशी.

## वेगळा, ताजा प्रयोग

रमाकाकी हा रेग्यांच्या लेखणीचा एक वैशिष्टयपूर्ण आणि समर्थ आविष्कार. सावित्रीइतक्याच काहीशा प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाची ही स्त्री नवरा 'नाना' देशकार्यात सर्वथा गुंतल्यानं तशी एकटीच मार्गक्रमणा करणारी. श्यामही मुंबईच्या त्या जीवनात मनानं एकाकीच राहिलेला. इथंच त्या दोघांची मनं जुळतात. श्यामच्या अगदी नवथर वयातच जवळीक साधते. हे साहचर्य मानसिक आणि बौद्धिकही असतं. त्याची परिणती म्हणून ती दोघं परस्परपूरक जीवन जगू लागतात. ही समजूतदार स्त्री प्रत्येक प्रसंगी त्याचं कोवळं मन जाणून घेते, त्याच्या भावनांवर हलकेच फुंकर घालते, त्याचे विचार फुलारून सोडते; इतकी की शेवटी श्याम तिला आपली आई, वडील, भाऊ, बहीण, मैत्रीण, गुरु ह्या साऱ्याच नात्यांनी स्वीकारतो. तीही त्याचं हे भावनात्मक साहचर्य सातत्यानं टिकवून ठेवते. रमाकाकीला त्यानं आधी मद्रासहून आणि मग इराणमधून लिहिलेली पत्रं विलक्षण प्रभावी आणि त्या दोन मनातला सुसंवाद साधणारी असतात. रेगे अशा पत्रांतून जायूसारख्या मुलीबद्दलच्या श्यामच्या नाजूक भावना आणि त्या संदर्भातल्या रमाकाकींच्या प्रगल्भ प्रतिक्रिया कधी रूपक-कथेचा तर कधी भूमितीतल्या अर्थपूर्ण आकृतींचा कल्पकतेनं वापर करून स्पष्ट करतात. मराठी कादंबरीतला रेग्यांचा हा प्रयोग वेगळा आणि आविष्काराच्या दृष्टीनं ताजा वाटतो.

श्याम आणि रमाकाकीतले हे भावनात्मक संबंध इतके परिपूर्ण अवस्थेला जाऊन पोहोचतात की, 'नाना' काकांच्या अकाली मृत्यूनं विधवा झालेल्या रमाकाकीला श्याम इराणमध्ये न्यायचं ठरवतो. तेव्हा तीदेखील त्याच सहजपणे त्याचा हा निर्णय मान्य करून टाकते इथेही श्यामसारख्या पंचविशीतल्या अविवाहित तरुणाबरोबर त्याच्याहून सात-आठ वर्षांनीच मोठ्या असलेल्या तरुण रमाकाकीला परदेशात पाठवताना श्यामचे वडील जरा नाराजच असतात. त्याआधीही रेग्यांच्या कादंबरीतल्या महत्त्वाच्या घटना इराणमध्येच घडत जातात. तिथे गालीचे खरेदी करणाऱ्या कर्सनदास कंपनीत श्याम चांगलंच बस्तान बसवतो. तिथल्या व्यवहारात आणि जीवनपद्धतीत रुळून जातो. इथेच त्याला त्याच्या सहाय्यकाची, अब्बासीची मुलगी सालेहा भेटते. सालेहा सुंदर असतेच, तेवढीच विचारीही. आपल्या आर्जवी स्वभावानं, प्रगल्भ विचारानं ती श्यामच्या मनाशी जवळीक साधते. त्याला जिंकून घेते आणि मग स्वतःच्या लग्नाआधीच्या एका हळव्या क्षणी आपला सुंदर देह श्यामला समर्पित करते आणि त्याच सुमारास कधी तरी रमाकाकी इराणात जाऊन पोहोचते.

## एक चिंतनशील अंतर्मुख लेखक

आता श्यामच्या मनाची विलक्षण ओढाताण सुरू होते. एकीकडे त्याच्यावर प्रेम करणारी सालेहा तर दुसरीकडे त्याची बालपणापासूनची जिवलग रमाकाकी. सालेहाशी श्यामचं जडलेलं हे नवं नातं रमाकाकी सहजपणे समजून-उमजून घेते आणि इराणमधल्या नव्या वातावरणाशीही व्यवस्थित जुळवून घेते. रेग्यांच्या कादंबरीचा शेवट मात्र विलक्षण प्रभावी असतो. एकीकडे पूर्वापारचा मानसिक आणि बौद्धिक सहचर असणारा श्याम अखेरी रमाकाकीशी अपरिहार्यपणे कायमचे शारीरिक संबंध प्रस्थापित करतो, तर त्याच वेळी विवाहित सालेहा आपल्यापोटी श्यामच्या अपत्याला जन्म देते. हा शेवट अतिशय नाट्यपूर्ण परिणाम साधतो. तो 'रेणू'हून अधिक नाट्यमय असतो, तर 'सावित्री' इतका सरळ-साधा नसतो. रेग्यांची ही कादंबरी शेवटी असंख्य प्रश्नांची कोंडाळी निर्माण करते. 'मातृका' इथेच संपत नाही तर संपूनही खूपशी मागे उरते.

रेग्यांच्या सर्वच कादंबऱ्यांचा, त्यातल्या स्त्रियांचा साकल्यानं विचार करताना असेच अनेक प्रश्न नेहमी मागे उरतात आणि मग सातत्यानं सतावतही रहातात. सावित्री, रेणू, रमाकाकी, सालेहा ह्यासारख्या संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या स्त्रिया ह्या रेग्यांच्या प्रतिभेचा आविष्कार म्हणून जन्माला येतात की त्या त्यांच्या अनुभूतीची चित्रणं उकलतात? की त्या दोहोंचं अप्रतिम मिश्रण करून रेगे मग त्यांना आपल्या समर्थ शैलीनं साकारतात, नवा संपन्न आकार देतात?

रंजनात्मक लिखाण हा रेग्यांच्या लेखणीचा पिंडच नव्हे. त्यामुळेच काही मोजक्याच पण ठळक साहित्यकृतीच त्यांच्या नावी जमा होतात. रेग्यांच्या सगळयाच लेखनातून जाणवतो तो एक चिंतनशील, अंतर्मुख लेखक. रेग्यांचे शब्द त्यांच्या अंतर्मनातले विचारच प्रवर्तित करतात. संदर्भ 'सावित्री'चा असो नाही तर 'मातृके'चा, रेग्यांच्यातला एक विचारी माणूस त्यांच्या शब्दांतून नेहमीच डोकावत असतो. प्रतिभावान लेखकाच्या मनोधर्माप्रमाणे रेगे नेहमी शाश्वताच्या, अंतिम सत्याच्याच शोधात असतात. 'मातृके'तली रमाकाकी गांधीवादी विसूभाऊ, साम्यवादी नीला देसाई, ह्यांची श्यामशी होणारी विचारांची देवघेव ह्याचंच प्रतीक ठरते. अशा विचारप्रवर्तनामुळेच रेग्यांच्या लेखणीला कित्येकदा जडत्व प्राप्त होतं. हे काहीसं जड-बोजड विचारांचं प्रकटन त्यांच्या कादंबरीला उंची मिळवून देत असलं तरी संदर्भांची, विचारांची गुंतागुंत त्यांची लेखणी कधी कधी क्लीष्टही करून सोडते. 'मातृके'च्या संदर्भातही ह्याचा प्रकर्षानं प्रत्यय येतो. रेग्यांची कादंबरी केवळ वाचनासाठी नसून विचार करण्यासाठीही असल्यामुळं असं घडणंही अत्यंत स्वाभाविक ठरते. 'मातृका' ही मराठी कादंबरीच्या क्षेत्रात निश्चितच एक मोलाची भर ठरेल. ◻

–अशोक प्रभाकर डांगे

**'मातृका'**
पु. शि. रेगे
मौज प्रकाशनगृह
पृष्ठे : १३६, मूल्य : तेरा रुपये पन्नास पैसे

# महाराष्ट्र राज्य नाटयस्पर्धा

## सालाबादप्रमाणे यंदाही पार पडल्या !

पुण्यात भरलेल्या राज्य नाटयस्पर्धेचा निकाल आणि निक्काल लागला! म्हणजे इतके दिवस जे चाललं होतं ती गंमतच होती तर, असा भासही झाला.

थिएटर अॅकेडमी पुलेंच्या 'तीन पैशाच्या तमाशा'त अडकलीय तर पी. डी. ए. वाले नाटय-संमेलनाच्या घाई-गडबडीत! राहता राहिली महाराष्ट्रीय कलोपासक संस्था. ती फुटल्यामुळे सगळा रंगच पालटून गेलाय. मग उरलेल्या तमाम हौशी नाटय-संस्थांनी पुढाकार घेतला. हे तीन शूर वीर रणांगणावर नाहीत असं कळल्यावर यांच्या आनंदाला पारावार तो काय उरणार! सर्वांनी बेधडक उड्या मारल्या.

या वर्षीच्या नाटयस्पर्धेत काहीच दम नव्हता. प्रेक्षकवर्गाची 'नेमकी' उपस्थिती आणि प्रयोग करणाऱ्यांचा उत्साह यांचा मेळ काही जमला नाही. एकूण सात नाटके सादर केली गेली. त्या सर्वांचाच हा थोडक्यात परामर्श.

पहिली सलामी 'रंगदीप'च्या 'खडाष्टक'ने दिली. 'आम्ही सेट न वापरतां नुसत्या पडद्यावर हे १९२४ सालातील नाटक सादर करणार!' (ही आमची प्रयोगशीलता!) या आवेशामुळे नाटकाचा पार फज्जा उडाला. नेभळट नवरा, खाष्ट बायको, सासरा व मुलगी यांच्या आधाराने हे विनोदी नाटक निर्माण होते. हे नाटक त्या वेळी फारच गाजले होते म्हणे! पण दिग्दर्शक डॉ. अनंत जोशी यांनी दिग्दर्शनाच्या सर्व कसोटया लावून हे नाटक जसंच्या तसं सादर करण्याचा अट्टाहास केला. नाटकात आनंद पानसे (कर्कशराव) यांच्या भूमिकेपलीकडे फारसं कोणी चमकलं नाही. राजन सावळे यांचा ऑक्वर्डनेस तर सतत जाणवत होता. बाबा कुलकर्णी यांचा अभिनय इतरांना उत्कारक ठरला एवढेच! बाकी हे नाटक सादर करण्यात 'रंगदीप'ने काय औचित्य साधले न कळे!

भरत नाटय-मंदिर संस्थेतून ड्रॉपर्सवाले बाहेर पडल्यावर त्यांनी आपलं तयार असलेल्या 'वाजे पाऊल आपुले' या नाटकाची एंट्री देऊन टाकली. नेपथ्य व श्री. विनायक गोडसे या ह्या प्रयोगाच्या जमेच्या बाजू. बाकी पाठांतर चोख! फक्त पात्रांचे आवाज प्रेक्षकांपर्यंत पोचण्यासाठी भरतवाल्यांनी काही तांत्रिक गोष्टीत सुधारणा करायला हवी होती. व्यावसायिक यशाचे हे नाटक स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळवून गेले. अर्थात एकूण स्पर्धेच्या दृष्टीने एक 'स्मूथ प्रॉडक्शन' म्हणून या नाटकाचा उल्लेख आवश्यक आहे.

अनिल सोनार लिखित 'चिमणीचं मन होतं मेणाचं' या नाटकाचा प्रयोग अॅक्टीव्ह थिएटर्सने सादर केला. पडदा वर जाताच सेट पाहून दिल खुष हो जाता है. पण सेटच्या गर्दीत बापडया पात्रांना बरेचसे संवाद उभे राहूनच म्हणावे लागले. हाय सोसायटीतील प्रेमाबद्दलची कल्पना व वैवाहिकतेच्या नीतीमूल्यात अडकलेल्या नायकाची ही कथा. अनिल सोनारांना काही ते लिहिणं जमलं नाही आणि बसविणाऱ्यांनाही ते बसविता आलं नाही हेच खरं! लेखक दिग्दर्शकावर आणि दिग्दर्शक लेखकावर खापर फोडणार असेल तर खरं म्हणजे दोघांच्याही चुका तेवढयाच (मोठया) आहेत. कालिंदीच्या भूमिकेत सौ. मानसी कोकीळ यांचा परीक्षकांनी गौरव केला हे ठीक झाले! बाकीच्या सर्व पात्रांना अनुल्लेखाने टाळणे एवढा एकच मार्ग उरतो.

इन्कमटॅक्स स्पोर्टस् अॅन्ड रिक्रीएशन क्लबने विजय तेंडुलकरांचं 'चिमणीचं घर होतं मेणाचं' हे नाटक सादर केलं. सुखी घरकुलाचं तरुण जोडप्याचं स्वप्न ते स्वप्न प्रत्यक्षात येण्यासाठी चाललेली धडपड छोटया-मोठया प्रसंगाद्वारे फुलत जातात. मुळात नाटकाची भाषा, प्रसंगांची रचना यामुळे नाटकाच्या संहितेत साधलेला परिणाम या प्रयोगानेही साधला. स्पर्धेत त्यातल्या त्यात उत्कृष्ट झालेला प्रयोग म्हणून चिमणीचं घर...चा उल्लेख अपरिहार्य आहे. रंगभूमीवरील पात्रांची फॉर्मेशन्स, त्यांच्या लकबी, संवादाची फेक यात दिग्दर्शक दिसत असला तरीही पात्रांनी समजून, उमजून भूमिका वठविण्यात यश मिळवलं.

विनया तांबेला उत्कृष्ट अभिनयाचं रौप्य-पदक मिळालं... तिच्या तुलनेत इतर पात्रे कमी पडत असली तरीही नाटय परिणामाला बाध आणत नव्हती, हे विशेष. दिवाकर हेजीब, डी. एस्. पाळंदे, विजयकुमार म्हैत्रस यांचा अभिनय उल्लेखनीय. नाटयकृतीचा एकसंध परिणाम होण्यासाठी नेपथ्यापासून प्रकाशयोजनेपर्यंत सर्वांनीच कष्ट केले होते. या नाटकाला प्रथम पारितोषिक देण्यात परीक्षकांना कोणती अडचण आली हे कळायला मार्ग नाही. पण इतर प्रयोगांच्या मानाने जाणवणारी तफावत परीक्षकांच्या ध्यानी आली नाही असे तरी कसे म्हणावे? काही तरी (ब्रह्म) घोटाळा झाला खास! दिग्दर्शनाचं दुसरं बक्षिस श्री. जे. एस्. देशपांडे यांना मिळालं आणि नाटकाला तिसरा क्रमांक मिळाला.

टेल्को कलासागरमधील काही लोकांनी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची मदत घेऊन (मदत म्हणजे निश्चित कोणत्या अर्थाने?) पद्माकर गोवईकरांचं 'सोमदत्त वेडा होता का?' हे नाटक बसविलं. सोमदत्ताची 'सायीकक केस' अशा काही आगळया वेगळया ढंगात सादर केली की, प्रेक्षकांच्या (आणि अर्थातच परीक्षकांच्याही) ते 'ओव्हरहेड' गेलं. सुरेश नाईक यांनी दिग्दर्शन केलं होतं. पात्रांना रंगमंचावर नेमकं काय करायचं असतं याचं ज्ञान नसल्याच दिसलं. दोघेजण पुढील बाजूस बोलत असले म्हणजे उरलेल्यांनी मागच्या गॅलरीत जाऊन गप्पांचं 'माईम' करायचं, ही गोष्ट अगदी 'नेत्रदीपक' होती. सोमदत्ताची भूमिका करणारे दिलीप जनपंडित तर कधी कधी प्रेक्षकांच्या अंगावर धावून जात होते...एकंदर प्रकार भलताच मेलोड्रॅमॅटिक वाटला.

नेपथ्य वगैरे चांगलं होतं; पण नाटकाशी, त्यांच्या अंतःप्रेरणेशी असलेला संबंध नेपथ्याने सूचित झाला नाही....

रवींद्र देशपांडे यांनी लिखित व दिग्दर्शित 'आक्रमण' संस्कृत विद्यामंदिरातर्फे सादर केलं. एका खेडेगावात रेल्वे येणार आहे, ही बातमी त्याच्या खेडेगावात उमटणाऱ्या रिॲक्शन्स या नाटकात बारकाव्यांसह दिसतात. रंगमंचाचा सुरेख वापर देशपांडेंनी राजा कुलकर यांच्या मदतीने वस्ती वसविण्यात केला. टीमवर्क म्हणून सर्वांचं अभिनंदन करायला हवं; पण या नाटकाचं अपयश कशात दडलं होतं याचा विचार केला तर एवढासा अनुभव चहू दिशांनी ताण ताण ताणला की त्यातील इंटेन्सिटी नष्ट होते, हाच अनुभव आक्रमणच्या बाबतीत आला. देशपांडे यांच्याकडे क्रिएटिव्हिटी आहे–जिद्द आहे. ही जिद्द खरोखर स्तुत्य आहे यात वाद नाही–पण मला असं वाटतं की, त्यांची पुढे जाण्याची दिशा चुकत आहे, त्यांनी पुनर्विचार केला पाहिजे.

शेवटी 'प्रमुख भूमिकेत' वगैरे उरलं ते 'एक कळी फुललीच नाही.' आराधना नाट्यसंघाने श्री. रवींद्र भट यांनी लिहिलेलं हे नाटक भालचंद्र पानसे यांच्या दिग्दर्शनाखाली सादर केलं. नाटकाचा हिरो लिंगपिसाट–घरातल्या मोलकरणीपासून दिसेल त्या स्त्रीवर तिरप्या नजरेनं पाहणारा–लग्न होतं; पण विकृती जात नाही–पत्नी अकाली विधवा होते–हा पहिला अंक. दुसऱ्या अंकात नायकाचा जुळा भाऊ येतो–नायकाच्या पत्नीवर मानसिक परिणाम–ती त्याला पती समजते–तिचे प्रश्न–वगैरे. एकंदर भरपूर जाहिरात करून व्यावसायिक रंगभूमीवर व्यवस्थितरीत्या चालणारं हे नाटक.

नेपथ्य चांगलं होतं. स्वतः पानसे यांनी आपलं काम जरासा वटवटीतपणा सोडला तर ठीक केलं. स्मिता ओक व गणा गोडबोले यांचा अभिनय उल्लेखनीय; पण शरद माने यांना प्रशस्तिपत्रक का दिलं कोणास ठाऊक! नायकाच्या आई झालेल्या सौ. साने यांनी मात्र भलताच गोंधळ उडवला. विसरणे, शब्दोच्चार यामुळे अनुभव घेण्यात बराच अडथळा आला. 'एक कळी' कुठलाच कलात्मक आनंद देऊ शकली नाही, हे मात्र खरं.

परीक्षकांचीही गंमतच. काही (च) नाटकांच्या वेळी ते कंटाळून बाहेर पडायचे. भोसलेंच्याकडील 'चहा' घ्यायचे–तरतरीत व्हायचे, मग परत अनुभव घेण्यास सज्ज!

या स्पर्धेने काय साधले वगैरे प्रश्न अनुचित व गैर असतात. स्पर्धा काही ना काही कॉन्ट्रिब्यूशन देतच असते. तेव्हा स्पर्धा निराशाजनक वगैरे काहीही झाल्या नाहीत. स्पर्धेचं स्पिरिट होतंच. प्रत्येकजण 'आमचंच पहिलं' असं म्हणू शकत होता इतका त्याला विश्वास! यात कुणाचंही अपयश वगैरे सामावलेलं आहे असं मला वाटत नाही. शेवटी यश-अपयश जर परीक्षकांच्याच हाती असेल तर तुम्ही काहीही करायचे नसते, आहे ते स्वीकारायचे असते.

जाता जाता एकच सूचना. निकाल लागल्यानंतर प्रत्येक संस्थेकडे त्यांच्या नाटकाच्या गुणांचा तक्ता पाठवून दिल्यास दर्जा सुधारण्यास मदत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संबंधित सरकारी अधिकारी इकडे लक्ष देतील काय?

**–प्रतिनिधी**

---

चित्रपट परीक्षण । सदानंद बोरसे

# शतरंज के खिलाडी

**बघण्यापूर्वी सत्यजित रेंचा चित्रपट, बघितल्यानंतर–?**

---

सत्यजित रे या नावाभोवती चित्रपटसृष्टीत केवळ भारतीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय चित्रपटसृष्टीतसुद्धा एक जबरदस्त वर्तुळ आहे. सत्यजित रे म्हणजे कलात्मकता, सत्यजित रे म्हणजे उत्कट विषयाचा अप्रतिम आविष्कार, सत्यजित रे म्हणजे नाविन्यपूर्ण प्रयोगशीलता, सत्यजित रे म्हणजे चित्रपट-दिग्दर्शन अशी किती तरी समीकरणे या वर्तुळाच्या आभेपासून फाकतात. साहजिकच या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या दिग्दर्शकाने हिंदी चित्रसृष्टीत पाऊल टाकण्यासाठी सिद्धता करताच एक उत्सुकता, एक आनंद चित्ररसिकांमध्ये निर्माण झाला आणि त्यांनी घोषणा केलेल्या 'शतरंज के खिलाडी'ची तितक्याच उत्कंठेने प्रतीक्षा केली जाऊ लागली.

चित्रपट पूर्ण झाल्यानंतर त्याला वितरक मिळण्यासाठी बरीच वाट पाहावी लागली आणि अखेर सत्याहत्तरच्या नोव्हेंबरमध्ये तयार झालेला हा चित्रपट तब्बल एक वर्षाने पुण्यात प्रदर्शित झाला.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील लखनौमधील मिर्जा सज्जादअली आणि मीर रोशनअली या दोन बुद्धिबळवेड्या जहागीरदारांची ही कथा. चित्रपटाच्या कथेचे श्रेय जरी स्व. प्रेमचंदांच्या नावावर जमा केलेले असले तरी आपल्या सार्वभौम अधिकाराचा मनसोक्त वापर करून दिग्दर्शक-पटकथाकार सत्यजित रेंनी कथेत यथेच्छ भले-बुरे बदल (म्हणजे भर अथवा वजाबाकी) केले आहेत. शिवाय प्रेमचंदांच्या मूळ कथेत मिर्जा व मीर या दोन प्रातिनिधिक पात्रांचे व्यक्तिचित्रणच प्रामुख्याने आले आहे. बाकी वाजिदअली शाह, त्या वेळची राजकीय व सामाजिक परिस्थिती इत्यादी गोष्टींचा आधार केवळ संदर्भासाठी व त्या व्यक्तिचित्रणाला पूरक म्हणून येतो. याउलट सत्यजित रेंनी वाजिदअली शाह हे संपूर्ण चित्रपटातील तीन पात्रांपैकी एक प्रमुख पात्र म्हणून रंगविले आहे. खरे तर सत्यजित रेंच्या कथेला प्रेमचंदांच्या उपकथानकाची जोड, अशीच परिस्थिती झाली आहे.

कथेमध्ये नसलेले पण पटकथा म्हणून घातलेले असे काही प्रसंग देतो.

१) रेसिडेंट ऑट्रमचे लखनौची परिस्थिती समजावून घेण्यासाठी आपल्या सहाय्यकाशी झालेले संभाषण.

२) मिर्जा सज्जादअलीच्या बायकोने बुद्धिबळाचे मोहरे लपवून ठेवणे.

३) मिर्जा व मीर दोघेजण आपल्या वकिलाकडे बुद्धिबळाचे मोहरे मागण्यासाठी जातात, तो प्रसंग.

४) मीरच्या बायकोचे आपल्या भाच्या-बरोबरचं लफडं.

५) वाजिदअली शाहशी संबंधित सर्व प्रसंग.

या व अशाच आणखी काही प्रसंगांची भर काही कल्पनेने व काही तत्कालीन इतिहासाच्या अभ्यासाने घातलेली आहे. या बहुतेक प्रसंगांमुळे चित्रपटाची रंगत वाढत जाते. उदाहरणार्थ– 'मीरसाहब की बेगम किसी अज्ञात कारण से उनका घर से दूर रहना ही उपयुक्त समझती थी। लेकिन जब दीवानखाने में बिसात बिछाने लगी और मीरसाहब दिनभर घर में रहने लगे, तो उन्हें बडा कष्ट होने लगा, उनकी स्वाधीनता में बाधा पड गयी।' एवढाच संदर्भ मूळ कथेत आला असताना त्यावरून मीरसाहेबांच्या बायकोचे साऱ्या लखनौत कुजबुजले जाणारे लफडे येथपर्यंत तो संदर्भ खुलविला आहे; पण त्याचबरोबर कथेतील काही प्रसंग– ज्यांनी ही रंगत अजून वाढविली असती– गाळलेले आहेत. त्याचे कारण मात्र कळले नाही.

उदाहरणार्थ– मिर्जा सज्जादअलीची बायको बुद्धिबळाच्या खेळावरून नवऱ्याशी भांडते, पट व मोहरे फेकून देते. या प्रसंगातील मूळ कथेत असलेला तिखटपणा चित्रपटात पार सपक करून टाकला आहे.

मीरसाहेबांच्या घरी बुद्धिबळाचा खेळ सुरू झाल्यानंतर त्यांच्या नोकरांचे त्यांच्या बायकोच्या कानी लागणेही गाळलेले आहे; पण या सगळ्या बदलांमध्ये मला अतिशय खटकलेला भाग म्हणजे मिर्जा व मीरच्या बुद्धिबळाच्या लढती. मूळ कथा न वाचता केवळ चित्रपट पाहणाऱ्याला हे प्रसंग अत्यंत खुसखुशीत व मनोरंजक वाटतील. (अपवाद फक्त शेवटच्या प्रसंगाचा.) पण मूळ कथेतील या लढतींचे प्रसंग, त्या वेळचे आक्रमक व बचावाचे संवाद, पवित्रे या सगळ्यांची खुमारी काही औरच.

पहिल्यांदा मिर्जासाहेब जिंकत असताना त्यांच्या बायकोचा आत येण्याबद्दल निरोप येतो. त्या वेळी ते जायला नाखूष, उलट मीरसाहेबांचा आत जाऊन येण्याबद्दल आग्रह चाललेला; कारण त्यांच्यावर मात होत आलेली. त्या वेळचे संवाद–

मीर–जाकर सुन आइये न। औरतें नाजुक मिजाज होती हैं।

मिर्जा–जी हाँ, चला क्यों न जाऊँ। दो किश्तों में आपको मात होती है।

मीर–जनाब, इस भरोसे न रहियेगा। वह चाल सोची है कि आपके मुहरें धरे रहें और मात हो जाय; पर जाइये, सुन आइये। क्यों ख्वाहमख्वाह उनका दिल दुखाइए गा?

मिर्जा–इसी बात पर मात ही करके जाऊँगा।

मीर–मैं खेलूँगा ही नहीं। आप जाकर सुन आइये।

मिर्जा–अच्छा, एक चाल और चलूं।

मीर–हर्गिज नहीं, जब तक आप सुनके नही आयेंगे, मैं मुहरें में हाथ नही लगाऊँगा।

त्याचप्रमाणे मशिदीच्या खिडारांमध्ये बसून बुद्धिबळ खेळतानाचे दोन प्रसंग.

पहिल्यात–इंग्रजी फौजा लखनौच्या दिशेने जात असताना मीरसाहेब आपली लंगडी बाजू सावरण्यासाठी लखनौची चिंता करीत आहेत तर मिर्जासाहेब केवळ 'मात' या एकमेव लक्ष्यावर नजर ठेवून आहेत.

याउलट दुसऱ्यात–इंग्रजी फौजा वाजिदअली शहाला पकडून परतत असताना मिर्जासाहेब आपली हार वाचवण्यासाठी नबाबाच्या नावाने नक्राश्रू ढाळत आहेत तर या वेळी जिंकत आलेले मीरसाहेब फौज, शहा यांच्याकडे दुर्लक्ष करून शह देत सुटले होते.

याउलट चित्रपटात मात्र या प्रसंगांमधील इंग्रजी फौज व वाजिदअली शहाची अटक या ठिकाणी 'डास चावणे' अशी क्षुद्र सबब टाकलेली आहे. भोवतालच्या संपूर्ण राजकीय व सामाजिक परिस्थितीवरून लक्ष ढळविणारेच नव्हे तर त्याबाबतीत उदासीन बनविणारे बुद्धिबळाचे व्यसन, त्यामागे लपलेला सुखासीन स्वार्थीपणा, या व्यसनामध्येसुद्धा जागा असलेला आणि प्रतिस्पर्ध्यावर मात करण्याची सतत ईर्षा बाळगणारा दोघांचा अहंगंड ही सगळी या दोन प्रसंगांमधील गहराई डासांनी एका फटक्यात साफ करून टाकली.

हीच गोष्ट कथेच्या व चित्रपटाच्या शेवटांबद्दल. कथेचा शेवट–मीरसाहेबांच्या एका चालीवरून दोघांमध्ये वाद सुरू झाला. आतापर्यंतच्या डावात हरत आल्याने मिर्जासाहेब चिडलेले; तर आताची चाल कायम ठेवल्यास मीरसाहेबांचा वजीर चाललेला. दोघेही हमरीतुमरीवर येऊन तलवारी काढून एकमेकांवर तुटून पडले आणि एकमेकांचे वार जिव्हारी लागून खलास झाले.

आपला राजा, आपले राज्य, आपले लोक, त्यांची स्वायत्तता यांबाबत कमालीची उदासीनता दाखविणारे मिर्जा व मीर. या साऱ्यांशी असलेल्या कर्तव्यापासून व जबाबदारीपासून दूर पळण्याचा भ्याडपणा दाखविणारे मिर्जा व मीर. हा भ्याडपणाही शौर्याच्या अभावामुळे नाही; तर केवळ ऐदी आयुष्याची चटक लागल्याने आलेल्या सुस्तीतून जन्मलेला नाकर्तेपणा. पण स्वतःचा अहंगंड दुखावला जाताच बुद्धिबळाच्या खेळीतून जन्मलेल्या एका अत्यंत फुटकळ व अकारण भांडणापायी स्वतःचे प्राण खर्ची घालतात.

'अपने बादशाह के लिए जिनकी आँखों से एक बूंद आँसू न निकला, उन्होंने शतरंज के वजीर की रक्षा में प्राण दे दिये। अँधेरा हो चला था। बाजी बिछी हुई थी। दोनों बादशाह अपने-अपने सिंहासनों पर बैठे मानो इन दोनों वीरों की मृत्यु पर रो रहे थे। चारों तरफ सन्नाटा छाया हुआ था। खँडहर की टूटी मेहराबें, गिरी हुई दीवारें और धूल-धूसरित मीनारें इन लाशों को देखती और सिर धुनती थीं।'

हे संपूर्ण वर्णन या अकारण हत्येनंतर मन उदास आणि विषण्ण करते. या मूर्ख नाकामपणाची कीव वाटते अन् चीडही येते.

याउलट चित्रपटाचा शेवट – मिर्जासाहेब हारत आलेले अखेर त्यांनी मीरसाहेबांच्या बायकोच्या लफड्यावरून त्यांना डिवचले. त्यावरून दोघांमध्ये हाणामारी शेवटी हे सगळे संपून पुन्हा एकदा दोघेजण बुद्धिबळाचा पट मांडतात व खेळ सुरू करीत असतानाच चित्रपटाचा शेवट.

मूळ कथेतील भांडणाच्या कारणातील निष्फळता या ठिकाणी नाहीशीच होते. बायकोच्या बदफैलीपणावरून केलेला अपमान पुरुषाला खवळविण्यासाठी पुरेसा आहे. चित्रपटातील पुढील संघर्षही एकतर्फीच – रागाने थरथरणारा पिस्तुल घेतलेला मीर आणि मीरसाहेबांनी पिस्तुल रोखल्यामुळे भेदरलेला, मनधरणी करणारा मिर्जा. मूळ कथेचा शेवट भडक असल्याने तो प्रभावी वाटतो असे नाही, तर कोणत्या तरी क्षुल्लक

मूल्यांसाठी ( त्या गोष्टीसाठी 'मूल्य' शब्द वापरणे हाही त्या शब्दाचा अपमान आहे. ) दोघांनी मृत्यू ओढवून घेतलेला पाहून मन उद्विग्न होते. मिर्जा व मीर यांची कर्तबगारी, शौर्य भलल्याच नाल्यातून वाहात गेल्याने ही शोकांतिका अधिक प्रभावी ठरते. याउलट चित्रपटाचा शेवट म्हणजे 'अशा 'Still the life went on smoothly.' अशा धर्तीचा. वाजिदअलीशहा मरो, लखनौ मरो वा आपली बायको मरो, आपण खुशीने बुद्धिबळ खेळू शकतो ना, अशा व्यक्तिमत्त्वाच्या दोन रंगेल उडाणटप्पू श्रीमंतांची ही गोष्ट बनते

कथेच्या बाबतीत एकच शेवटचा मुद्दा —

प्रेमचंदांनी वाजिदअलीशाहबद्दल जे संदर्भ दिले आहेत त्यांवरून तो आत्यंतिक विलासी, ऐंदी, भित्रा, कर्तृत्वशून्य आणि राज्यकारभाराच्या बाबतीत गलथान होता असे वाटते. उदाहरणार्थ

'राज्य में हाहाकार मचा हुआ था। प्रजा दिन दहाडे लूटी जाती थी।......देश में सुव्यवस्था न होने के कारण वार्षिक कर भी न वसूल होता था।......नबाब वाजिद-अली पकड लिये गये थे, और सेना उन्हें किसी अज्ञात स्थान को लिये जा रही थी। शहर में न कोई हलचल थी, न मारकाट। यह वह अहिंसा न थी, जिस पर देवगण प्रसन्न होते हैं। यह वह कायरपन था, जिस पर बडे से बडे कायर भी आँसू बहाते हैं।'

तर सत्यजित रेंनी जो वाजिदअलीशाह उभा केला आहे तो विलासी आहे; पण ऐंदी नाही, तर कलासक्त आहे. राज्यकारभाराच्या बाबतीत गलथान आहे. कारण राज्यकारभारापेक्षा त्याचे मन काव्यात, कलांमध्येच गुंतलेले आहे. त्यामुळे आपल्या कविता आपली प्रजा गाते, आवडीने गाते एवढ्यावर तो संतुष्ट आहे. प्रजेच्या अन्य सुख-दुःखाची त्याला पर्वा नाही. तो कर्तृत्वशून्य आहे; पण भित्रा नाही. कारण ही कर्तृत्वशून्यता इंग्रजांनी आतापर्यंत केलेल्या उपकारांच्या ओझ्यामुळे असलेल्या कृतज्ञतेतून आली आहे. त्याचे प्रजेवर प्रेम आहे. प्रजेने सांगितल्यास तो सिंहासन सोडायला तयार आहे; पण हे प्रेम एक शासक, एक पालक म्हणून नाही, तर कलाकार व व रसिक यांच्यातील प्रेम आहे. बहादूरशहा जफरप्रमाणे लखनौ सोडण्याच्या कल्पनेने यालाही काव्य सुचते.

आता यातील इतिहासाशी इमान राखणारे चित्र कोणते, हा अभ्यासाचा विषय. प्रेमचंदांना मुख्यतः वाजिदअलीचे व्यक्तिचित्रण रेखाटायचे नसल्याने दोन्हीतील चांगले कोणते, हा प्रश्नच उद्‌भवत नाही.

असाच यापूर्वी मीर व मिर्जाच्या संदर्भात येऊन गेलेला भाग— प्रेमचंदांनी कथेतील वर्णनांमधून तत्कालीन लखनौमधील राजकीय व सामाजिक अधःपतन रंगविले आहे, तर सत्यजित रेंनी ही अधःपतनाची खोली काढून टाकून तत्कालीन सुस्तपणा अथवा उदासीनता दर्शवलेली आहे. हे समाजचित्रण करण्यासाठी म्हणून दाखविलेले पतंगबाजी, कोंबड्यांची झुंज, एडक्यांची टक्कर हे प्रसंग फारच सामान्य होते. मात्र या प्रसंगांना आणि इतरत्रही बऱ्याच ठिकाणी असलेले अमिताभ बच्चनच्या आवाजातील निवेदन शब्द आणि स्वर या दोन्ही दृष्टींनी अत्यंत प्रभावी.

संपूर्ण चित्रपटात प्रामुख्याने वाव तिघांनाच— मीर रोशनअली (सईद जाफ्री), मिर्जा सज्जादअली (संजीवकुमार) आणि वाजिदअली शाह (अमजादखान).

सईद जाफ्रीने संवादफेकीतील अत्यंत सहजता, सरसरा बदलणारा आत्यंतिक भावदर्शी चेहरा आणि कित्येकदा अनेक शब्दांचे काम करून जाणारे भावदर्शन यांच्या जोरावर संपूर्ण चित्रपटभर वरचष्मा ठेवला आहे. संजीवकुमारच्या खात्यावरही हीच वैशिष्ट्ये; पण सइद जाफ्रीचा मीर रोशनअली काकण-भर (आणि काकणभरच) सरस वाटतो. त्या दोघांची पडद्यावरील जुगलबंदी किंवा एकमेकांना मिळणारी साथ केवळ अवर्णनीय.

अमजादखानला त्याच्या आतापर्यंतच्या गब्बरचक्रापेक्षा अतिशय वेगळी भूमिका मिळाली आणि त्यानेही ती अत्यंत सुरेख साकार केली आहे. अगदी क्वचित त्याच्या बोलण्यात गब्बरचा सूर डोकावतो (उदा. पूरेऽ होशोहवास खो बैठे।) पण कदाचित तो आपल्या डोक्यातच जास्त बसल्याने आपल्याला जाणवत असावा. सत्यजित रेंचा आधी वर्णन केलेला वाजिदअली, आपल्या असाहायतेमुळे होणारी त्याची तडफड, त्यातून चाललेली धडपड हे सगळे अमजादने सुरेख साकार केले.

याशिवाय वीणा ( वाजिदअलीची आई ), टॉम अल्टर (दुभाष्या) आणि रेसिडेंट ऑट्रम व वजीर मदामुद्दौलाचे काम केलेले अभिनेते छोट्या भूमिकांमधूनही लक्षात राहिले. काही छोट्या भूमिकांकडे मात्र दिग्दर्शकाचे दुर्लक्ष झाल्यासारखे वाटले. उदाहरणार्थ— गावाबाहेरच्या खेडचातील छोटा मुलगा कल्लू. त्याचे बोलणे ही विशिष्ट लकब न वाटता अत्यंत एकसुरी व कंटाळवाणे वाटले.

चित्रपटाचे संगीत स्वतः सत्यजित रेंनीच दिले होते. त्यांनी निवडलेले पार्श्वसंगीताचे तुकडे वाईट नव्हते, इतकेच. सुरुवातीचा तबल्याचा तुकडा फक्त उल्लेखनीय. संपूर्ण चित्रपटाचा एक अविभाज्य व अपरिहार्य घटक बनून राहणाऱ्या रेंच्या 'पथेर पांचाली', 'देवी' इत्यादी चित्रपटांमधील संगीत आठवल्यानंतर त्यांनी ही जबाबदारी स्वतः न घेता एखाद्या रविशंकरवरच सोपवावी, असे वाटते.

शेवटचा आणि सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दिग्दर्शक सत्यजित रे यांची या चित्रातील कामगिरी. दिग्दर्शक व पटकथाकार म्हणून त्यांनी कथेची केलेली मोडतोड व तिची योग्यायोग्यता यापूर्वी आलेली आहेच. जो चित्रपट त्यांनी प्रेक्षकांना दिला, त्यातही चित्रपटाच्या संपूर्ण व एकात्म परिणामापेक्षा तपशील भरण्यावर व त्याच्या बारीक-सारीक पणावर त्यांनी अधिक भर दिला. 'लेखकाने काय लिहिले आणि दिग्दर्शकाने त्याचा कसा अर्थ लावावा?' हा वादाचा विषय होऊ शकेल; पण काही तरी अर्थ लावून तो शक्य तितक्या ताकदीने प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्याऐवजी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील बुद्धिबळाचे पट, मोहरे, दस्तऐवज, पोषाख, हत्यारे इत्यादींचे संग्रहालयाला साजेसे प्रदर्शन भरविण्यावरच त्यांनी जास्त भर दिला. शिवाय मीर मिर्जाच्या बुद्धिबळाच्या व्यसनाचे कथानक आणि वाजिदअली शाहची होत असलेली कोंडी या दोन्ही गोष्टी परस्परपूरक न वाटता खूप ठिकाणी तुकडेजोड केल्यासारख्या वाटल्या. जुन्या चित्रांचा वापर, लॉर्ड डलहौसीचे एक व्यंगचित्र, अमिताभचे निवेदन या गोष्टींतून सत्यजित रेंचा सराईतपणा दिसून आला; पण त्यांचे खास कौशल्य नजरेत भरविणाऱ्या जागा फार कमी. (अमजदखानाचे त्याल,

भेटण्यास आलेल्या इंग्रजांकडे टाकलेले Looks आणि त्यावर त्या इंग्रजांच्या निःशब्द पण तरीही खूप बोलक्या प्रतिक्रिया– अशा कटाक्षाने टिपलेल्या जागा फारच कमी.) प्रमुख पात्रांची अचूक निवड आणि त्यांच्या अंगभूत कौशल्याचे योग्य दर्शन हाही भाग त्यांच्या सराईतपणातच जमा करावा लागेल. या चित्रपटातून त्यांनी प्रथमच बहुरंगी माध्यम वापरले; पण काळ्या-पांढऱ्या छटांचा सुंदर वापर करून अनेक दृश्ये टिपणाऱ्या सत्यजित रेंना हे अनेक रंग मात्र मनाप्रमाणे खेळवता आले नाहीत. काही ठिकाणी तर आजूबाजूच्या चकचकाटातून वा फिक्या लाल-पिवळ्या पार्श्वभूमीवर पड्द्यावर बोलणारी पात्रे शोधावी लागत. विरोधी रंगांमधून उठावदारपणा आणणे अशी बारीकशी गोष्ट ते अमलात आणू शकले असते. त्यांनी एकूण चित्रपटात खचाखच भरलेले तपशील त्यांची आताही जागृत असलेली विद्यार्थीवृत्ती आणि चित्रपटाच्या ऐतिहासिक भागासाठी त्यांनी केलेला व्यासंग दाखवत असेलही आणि आपला विषय जास्तीत जास्त प्रभावी रीतीने मांडण्यासाठी उत्तम दिग्दर्शकाला या गोष्टींची आवश्यकताही असते; पण या अभ्यासू विद्यार्थ्याने वा व्यासंगी विद्वानाने दिग्दर्शकाला खाऊन टाकू नये.

आतापर्यंत आपण सत्यजित रेंचा चित्रपट बघायचे ठरविल्यापासून ते तो बघितल्यानंतरही तो लक्षात राहतो तो सत्यजित रेंचा चित्रपट म्हणूनच. 'शतरंज के खिलाडी' मात्र बघायला जाताना 'रेंचा चित्रपट' असला तरी बाहेर पडताना तो 'सईद जाफ्री संजीवकुमार वा अमजदखानचा चित्रपट' बनलेला असतो. □

रंगभूमी ।

# सायसाखर

## किती तरी वेळ ओठांवर रेंगाळणारी!

एक असतो म्हातारा
आणि एक म्हातारी.

त्यांना असते एक मुलगी. काळ्याभोर केसांची. सायसाखरेच्या ओठांची.

मुलगी वयात आलेली.

कॉलेजात जात असते.

कॉलेजातला एक मुलगा तिच्यावर प्रेम करू लागतो.

तो म्हणतो, 'तुमचे केस किती सुरेख आहेत!'

आणि म्हणतो,

'मी मेट्रोची दोन तिकिटं काढली आहेत, तुम्ही याल ना?'...

ती म्हणते, 'हो...येईन ना!'

पण म्हाताऱ्याला आपल्या मुलीची फार काळजी असते.

म्हातारा त्या मुलाला निरनिराळे प्रश्न विचारतो

आणि मगच तिला त्याच्याबरोबर सोडतो.

म्हातारा–म्हातारींचं आपल्या लेकीवर जिवापाड प्रेम असतं.

केवळ लेकीवरच नाही...अनेक गोष्टींवर–

एकमेकांवर...रहात्या घरावर..स्वत:च्या सुखद भूतकाळावर...बालपणीच्या आठवणींवर...तितकंच अगदी छोट्या क्षुल्लक गोष्टींवरही...गळणाऱ्या नळाच्या व्हायसरवर, वापरणाऱ्या साबणावर, एवढंच काय, साचलेल्या रद्दीवरदेखील...

पण या सुखी-समाधानी कुटुंबावर एक काळीकुट्ट सावली पसरत असते.

त्यांच्या घराचं छप्पर क्षणाक्षणाला खचत चाललेलं असतं–

आणि कोणत्याही क्षणाला ते त्यांच्या अंगावर कोसळणार असतं.

यात आणखी भर म्हणूनच की काय,

घरात गळणारा नळ फुटतो आणि घरभर पाणी होतं.

वरून छप्पर आणि खालून पाणी अशा दुहेरी कोंडीत ते सापडतात. तरीही प्रत्येक गोष्टीवर असलेलं त्यांचं प्रेम तसूभरही कमी होत नाही. शेवटच्या क्षणापर्यंत छप्पर आणि पाणी यापासून स्वत:ला वाचवायची धडपड करतात.

एक वार्ताहर त्यांच्या घरी येतो. बातमीसाठी.

ते त्याला घडलेली सर्व हकीगत सांगतात. आपल्या कुटुंबाचा फोटोही काढून घेतात.

मुलगा आणि मुलगी सांताक्रूझ बस-डेपोतल्या बसमधून फिरायला जातात. समुद्रावर. मुलाला पोहायची लहर येते. सर्व कपड्यांनिशी तो पाण्यात उतरतो; पण दुर्दैवाने बुडून मरण पावतो.

मुलगी एकटीच घरी परत येते. रडत रडत. हुंदके देत.

म्हातारा-म्हातारी तिची समजूत घालतात.

काऊ-चिऊची गोष्ट सांगतात. मुलगी हसू लागते.

तेवढ्यात अचानक छप्पर खाली येतं.

तिघांना गाडून टाकतं.

पण गोष्ट ही एवढीच नाही.

हा झाला फक्त दुसरा प्रवेश. अच्युत वझेंच्या 'सायसाखर' नाटकाचा.

नाटकाला सुरुवात होते ती वेगळ्याच पद्धतीने–

एक तरुण पुरुष आणि तरुण स्त्री एका घरात प्रवेश करत असतात.

इस्टेट-एजंट त्यांचं स्वागत करत असतो.

घर असतं खूप मोठ्ठं...किती तरी खोल्यांचं...सर्व सुखसोयींनी युक्त–व्हरांडा, संडास, बाथरूम, लाइट, पाणी...शिवाय समोर समुद्र, आडवा पसरलेला. घरात झुळझुळ वाहणारा वारा. थोडक्यात घर कुणाच्याही पसंतीला उतरेल असं–

आणि मुख्य म्हणजे बिनपागडीचं.

इस्टेट-एजंट त्या दोघांना घरातल्या प्रत्येक खोलीची ओळख करून देतो.

पण त्या घरामध्ये एक म्हातारं जोडपं पूर्वीपासूनच वास्तव्य करून राहिलेलं असतं. तरुण पुरुषाच्या जेव्हा ही गोष्ट लक्षात येते तेव्हा तो चिडतो. इस्टेट-एजंट त्याला सांगतो, तुम्ही म्हाताऱ्यांना 'इग्नोर' करा.

भाडं-वसुलीला परत येईन, असं सांगून एजंट निघून जातो.

आता उरतात चौघेजणं–एकमेकांशी ओळख करून, आपापल्या आवडीनुसार टाइम पास करायला लागतात.

मुलगा मुलीला म्हणतो, 'आपण प्रेम करू या का?'...

मुलगी म्हणते, 'नको, प्रेमात अपघात होतात!'

इतका वेळ शांत बसलेला म्हातारा अचानक ओरडतो,

'नाही मुली, तो अपघात नव्हता...'

मुलगी थक्क होते. म्हणते, 'नाही कसा ...सांताक्रूझ बसडेपोतल्या बसमधून आम्ही फिरायला गेलो हा काय अपघात नव्हता... तिथून आम्ही समुद्रावर फिरायला गेलो हा

काय अपघात नव्हता ?'.. म्हाताऱ्याला हे सगळं माहितच असतं. त्या पुढची हकीगत तो तिला सांगतो.

हळू हळू त्या तरुणालाही त्या सर्व गोष्टी जाणवू लागतात. जणू तो ही त्या प्रसंगी हजर होता.

इतक्यात म्हातारीला दिसत की, घराचं छप्पर हळू हळू खाली येतंय. अतिशय सावकाश, पण निश्चितपणे. एखादा शिकारी सावज हाती लागल्यावर जशी पावलं टाकतो –सावध पण निर्णयात्मक. इस्टेट-एजंट पुन्हा येतो. म्हातारीला वाटतं, तो आपल्याला घराबाहेर काढणार. ती गयावया करू लागते. आम्ही जास्त बोलणार नाही, भांडणार नाही, चिडणार नाही. गुण्यागोविंदाने नांदू. ती त्याला हळूच त्या खचणाऱ्या छपराबद्दलही सांगते. तसा तो छद्मी हसतो. काहीही न बोलता आपल्या पावलांचा जीवघेणा आवाज काढतो आणि इतकंच म्हणतो,

'मंडळी, मी पहिल्या महिन्याचं भाडं वसूल करायला आलोय.'

नाटकाचा पहिला प्रवेश इथंच संपतो.

पण गोष्ट ही एवढीही नाही.

तिसरा प्रवेशही अतिशय छोटाच.

म्हणजे दुसऱ्या प्रवेशात छप्पर कोसळून ते तिघे गाडले गेल्यावर–

पुन्हा भिंती उभ्या राहतात–छप्पर सावरतं.

त्याच घरात नवीन मंडळी येतात.

तितक्याच दिलखुलासपणे इस्टेट–एजंट स्वागत करतो.

घराची पुन्हा ओळख करून देतो आणि म्हणतो–

'मंडळी, तुम्ही या घरात सुखाने रहा. अट एवढीच, माझं भाडं नियमित देत चला.'

गोष्ट, कदाचित, याहूनही मोठी असेल.

अच्युत वझेलिखित 'सायसाखर' या नाटकाचा प्रयोग 'उन्मेष प्रायोगिक रंगमंच' संस्थेने छबिलदास हायस्कूलमध्ये केला.

'सायसाखर' हा एक 'ॲब्सर्ड प्ले' आहे. नाटकाला सुरवात, मध्य, शेवट नाही. एक सतत वाहणारा अनादि-अनंत प्रवाह त्यात आहे. तेच जीवन–तशीच माणसं–तेच तेच खुपणारे प्रश्न–तीच तीच असमाधानी उत्तरं. या प्रश्नांची उत्तरं आयुष्यभर फक्त शोधायचीच असतात. खरी उत्तरं कधीच गवसत नाहीत आपल्याला. हाती लागतात त्या केवळ उत्तराच्या वेगवेगळ्या छटा. त्या सावलीवरूनच मग आपण केवळ कल्पना करायची, खऱ्याखुऱ्या आकृतीची, उत्तराची, प्रतिमेची; पण तरीसुद्धा प्रश्नांची धार काही कमी होत नाही. ते तसेच भडसावत रहातात. आपल्या आयुष्याला खरोखरच काही अर्थ आहे काय ?–आपल्या जीवनात घडणाऱ्या निरनिराळ्या घटना, आपल्या सहवासात येणारी वेगवेगळी माणसं, आपल्याला सुचणारे विविध विचार, काही गोष्टींबद्दल वाटणारी ओढ, आपुलकी, तितकाच काही गोष्टींबद्दलचा तिरस्कार, वेगवेगळ्या प्रसंगीचे आपले वेगवेगळे दृष्टीकोन ह्या सर्वांना एका सलग रेषेत साधणारं सर्वोच्च सूत्र अस्तित्वात आहे काय ? एकाच वेळी हसवत आणि रडवत आपल्याला खेळवणारा कुणी जगन्नियंता खरोखरच आहे काय ? थॉमस हार्डी म्हणतो, 'We are just puppets in the hands of a supreme, imanent will.' आपण म्हणजे केवळ कळसूत्री बाहुल्याच का ? घडणाऱ्या घटनांमध्ये 'आपण' कुठेच नसतो ? सगळे केवळ अपघातच असतात ? आणि तरीही हे माझं आहे, आपलं आहे ही भावना आपण का जोपासतो ? का आपण भांडतो, चिडतो, प्रेम करतो ? घराचं छप्पर कधी तरी कोसळणार, हे आपल्याला पक्क माहीत असूनही आपण त्याकडे दुर्लक्ष करतो, का आपण साफ विसरूनच गेलेलो असतो ? आपल्याला भूल देऊन पाठवलंय का या जगात ?–असे निरनिराळे प्रश्न. उसळणाऱ्या लाटांसारखे, आपण त्या भोवऱ्यात पुरते अडकून जातो, थकून जातो. हे सर्व प्रश्न वझ्यांनी आपल्यासमोर मांडलेत, एका सर्वसामान्य कुटुंबाच्या उदाहरणावरून. नाटक सगळं प्रतिकात्मक आहे. तरीही त्यातलं कुठलंच प्रतीक किंवा कोणतीही घटना अनोळखी वाटत नाही. आपण आपल्यालाच पहातो, नाटकाच्या प्रत्येक पात्रात.

अच्युत वझ्यांची प्रतिभा आणि लेखनकौशल्य जाणकारांनी यापूर्वीच मान्य केलंय. या नाटकात त्यांची प्रतिभा ऐन बहरात आलीय. जीवनातल्या अनेक स्तरांना त्यांनी स्पर्श केलाय–साध्या, सोप्या शब्दातून, सहज सामान्य घटनांमधून. वझ्यांचा जाणवणारा दुसरा ठळक विशेष म्हणजे त्यांच्या लेखनातील काव्यात्मकता. अनेक प्रसंगी ते इतके हळवे होतात की, एखादी मृदु–मुलायम कविता आकाराला येते. वार्ताहराच्या प्रसंगात वार्ताहराच्या प्रश्नांना उत्तर देता देता म्हाताऱ्याचा गळा दाटून येतो आणि तो गाऊ लागतो.

आज आमच्या घरी
बसलंय दबा धरून आभाळ,
ते कोसळणार कोसळणार.
सागरावरती घागरी
घागरीवरती फळी
फळीवरती खुर्ची
खुर्चीवरती आम्ही आज धडपडणार...

'सायसाखर' या नाटकाचं वैशिष्टच म्हणजे एका वेगळ्याच विलक्षण पद्धतीने नाटकाची केलेली मांडणी. एक लांबचं उदाहरण जर द्यायचं झालं तर कीर्तनामध्ये जसा प्रथम एक मूळ अभंग असतो, त्यानंतर पूर्वरंग असतो आणि मग उत्तररंग असतो–काहीशा त्या पद्धतीनं नाटक प्रेक्षकांसमोर उलगडत जातं. तसा नाटकाचा अन्वयार्थही अनेक प्रकारे लावता येईल.

नाटकाच्या दिग्दर्शन आणि संगीताची जबाबदारीही श्री. अच्युत वझे यांनीच सांभाळलीय-लेखनाच्याच तोलामोलानं. नाटकात एकूण पात्रं, पाच. विनय आपटे–म्हातारा, रोहिणी हट्टंगडी–म्हातारी, जयराम हर्डीकर–तरुण पुरुष, सुषमा तेंडूलकर–तरुण मुलगी आणि जयंत करगुटकर–इस्टेट–एजंट व वार्ताहर. सर्वांचीच कामं अतिशय सुरेख झाली आहेत आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, प्रत्येक कलाकाराला नाटक आणि स्वतःची भूमिका पूर्णपणे समजल्याचं जाणवत होतं. हे यश दिग्दर्शकाचं म्हणायचं तर तितकंच ते कलाकारांचंही आहे.

**–दीपक कुलकर्णी**

# अलिगड दंगलीनंतरचे कवित्व

: पृष्ठ ८ वरून

कार्यकर्त्यांची साथ यासाठीच आवश्यक आहे. तेव्हा त्यांच्या भावनांना दुखविणे हिताचे नाही. मग संघाला अपराधी समजणे व्यवहार्य ठरेल का ?

६ ) खुर्शिद अलमखान यांनी स्वच्छ शब्दांत सांगून टाकले आहे की, केवळ नुकत्याच झालेल्या दंगलीबद्दल नव्हे तर थेट स्वातंत्र्य मिळाल्यापासून जे जे दंगेधोपे झाले त्या सर्वाबद्दल रा. स्व. संघ जबाबदार आहे.

अलिगड–दंगल तर आटोपली आहे; पण पुढाऱ्यांच्या पत्रकबाजीमुळे जी दंगल उसळली आहे ती किती तीव्र आहे हे यावरून लक्षात आले असेलच–ही सारी वक्तव्ये आणि पत्रके संघवाल्यांच्या मुळावर घाव घालत आहेत यात काहीच संशय नाही; पण जरा तपशिलात जाऊन अलिगड-दंगलीची नीट माहिती मिळविली तर काही गैरसोयीचे मुद्दे उपस्थित होतात हे लक्षात घेतले पाहिजे.

टाइम्स ऑफ इंडियाच्या १९ व २० ऑक्टोबरच्या अंकात अलिगड–दंगलीसंबंधी एक लेखमालाच प्रसिद्ध झाली आहे. या लेखमालेवरून हे गैरसोयीचे मुद्दे लक्षात येतात.

१ ) १२ सप्टेंबरला झालेली दंगल ऑगस्टच्या शेवटच्या सप्ताहात जी भीषण परिस्थिती उद्भवली होती त्या परिस्थितीशी संबंधित आहे. ऑगस्टच्या शेवटच्या दिवसांत कुणा एका हिन्दूचे सक्तीने धर्मान्तर झाले अशी म्हणे अफवा पसरली व वातावरण एकदम अशान्त झाले. पुढे सदर माणसानेच आपण राजीखुषीने व अक्कलहुषारीने पैगंबराचे अनुयायी बनलो आहोत असे जाहीर केले व वातावरण निवळले.

२ ) दुर्दैवाने १२ सप्टेंबरला अनिर्णित ठरलेल्या एका कुस्तीमुळे वातावरण पुन्हा पेटले. एक आखाडा मुसलमानांचा, तर दुसरा हिंदूंचा. तेव्हा सामना निकाली लागला असता तर पंचाईत झाली असती, हे लक्षात घेऊन पंचमहोदयांनी सामना अनिर्णित ठेवला. याचा कुणाला राग आला व कुणी काय केले हे घटनाक्रम लक्षात घेतला तर सहज कळून चुकते.

३ ) कुस्ती संपल्यानंतर दुसऱ्या की तिसऱ्या दिवशी पंच म्हणून काम करणाऱ्या विष्णुदत्तनामक व्यक्तीवर हल्ला झाला. पुढे कचरमल नावाच्या हलवायावर हल्ला झाला. त्यानंतर सुरेश भुरा नावाच्या नागरिकाला भोसकण्यात आले. हे तिघेही जण हिंदू होते. म्हणून लगेच संघाचे स्वयंसेवक होते असे म्हणणे सत्याला सोडून बोलल्यासारखे ठरेल. विष्णुदत्त तर पंच होता, याचाच अर्थ दोन्ही तालमींच्या विश्वासातला, दोन्ही आखाड्यांकडून मान्यता पावलेला माणूस होता. कचरमल विचारा नाकासमोर सरळ रस्त्यावर चालणारा एक सर्वसामान्य दुकानदार होता. सुरेश भुरा कोण होता माहीत आहे का ? इंदिरा काँग्रेसचे कार्य करणारा कार्यकर्ता. ही त्याची कीर्ती अलिगडमध्ये सर्वश्रुत आहे.

४ ) या तिघांपैकी विष्णुदत्ताचा अपवाद वगळल्यास बाकी दोघांनी कायमचे डोळे मिटले; पण शेवटचा 'राम' म्हणण्यापूर्वी ज्या खुनी व्यक्तींची नावे त्याने उच्चारली ती 'दुसऱ्या जमातीची' माणसे आहेत.

५ : सुरेश भुराचा मृतदेह त्याच्या भावाने रुग्णालयातून अक्षरशः पळवून नेला व मिरवणुकीने दहनभूमीत पोचविला. ही मिरवणूक काढणारे संघवाले कसे असतील ? सुरेश भुराचा भाऊ व इतर नातेवाईक संघवाल्यांना जवळ तरी करतील का ? पण नेमक्या या प्रकरणानेच पोलिसांचा 'मामा' केला व वातावरण पेटविले. कदाचित म्हणूनच टाइम्सने आपल्या लेखमालेचे जे शीर्षक दिले आहे ते मला या संदर्भात सांगणे उचित वाटत आहे. हे शीर्षक बघा काय आहे ते :

'Police ineptitude was the last straw.'

६ : त्यानंतर १६ ऑक्टोबरला अलिगड विश्वविद्यालयातला एक कारकून श्री. शमीम अकरा दिवसांच्या यातनांना बळी पडला. पाच ऑक्टोबरला त्याला गोळी लागली होती. त्यानंतर अकरा दिवस बिचारा जीवन-मरणाच्या उंबरठ्यावर रेंगाळत होता. शेवटी त्याची सारी धडपड संपली तेव्हा विश्वविद्यालयातल्या कर्मचाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी त्याची शवयात्रा काढण्याचे नक्की केले होते; पण सरकारी अधिकाऱ्यांनी व समजूतदार प्राध्यापकांनी या मंडळींचे मन वळविले आणि शवयात्रा रद्द करण्यात आली. साहजिकच वातावरण भडकले नाही.

हे सारे मुद्दे गैरसोयीचे आहेत असे मी वर म्हटले आहे. कारण यात कुठेही संघाचा संबंध येत नाही. पोलिसांनी थोडासा हलगर्जीपणा केला व लोकांनी अफवांचे पीक काढले तर वातावरण पेट घेते. उलटपक्षी पोलिसांनी वेळीच काळजी घेतली, लोकरंजन करण्याचा मोह टाळला, सर्व हालचाली द्रुतगतीने केल्या तर परिस्थिती काबूत ठेवता येते– हाच या मुद्द्यांचा निष्कर्ष आहे. ज्या शहरात स्वतंत्र मुस्लिम विद्यापीठ आहे तिथे हिंदु-मुस्लिम दंगल उसळते; पण खुद्द विद्यापीठ शांत राहते, ही बाजूही विसरून चालणार नाही. म्हणजे पुरोगामी विचारसरणीच्या लोकांची सारी मदारच कोसळली. समजा, या विद्यापीठावर हल्ले झाले असते तर देशातल्या जातीयवादी वृत्तीवर आसूड ओढण्याची संधी मिळाली असती. संघवाल्यांनी बाहेरून तैनात आणली, सन १९४७ पासून नेहमी भडका उडविण्यात रुची दाखविली, कमालीचे पूर्वनियोजन करून हल्ले केले, हे जर खरे असेल तर संपूर्ण उत्तर प्रदेशात अथवा कमीत कमी संपूर्ण अलिगड शहरात सर्वदूर दंगेधोपे का नाही झाले ?

आपल्या सुदैवाने व पुरोगामी मंडळींच्या दुर्दैवाने राजकारणापासून चार हात दूर असणारी माणसे फार जपून विधाने करीत आहेत.

मुळात कुस्त्यांचे सामने टाळले असते व पोलिसांनी सुरेश भुराच्या प्रेताचे सार्वजनिक दहन करण्यास मनाई केली असती तर वातावरणाचा भडका उडाला नसता हे नक्की. सर्वसाधारण माणूस कोणत्याच धर्माला अथवा संघटनेला दोष देत नाही छोट्या-मोठ्या प्रश्नावर आपले भांडवल उभारणाऱ्या, लोकांच्या होळीवर स्वतःची पोळी भाजणाऱ्या राजकारणी व्यक्तींना मात्र अपराधी ठरविले पाहिजे अशी सर्वसाधारण भावना आहे.

म्हणजे सगळेच मुसळ केरात गेले. या दंगलीमुळे उत्तर प्रदेशातले जनता सरकार मोडीत काढता येईल. संघ-जनसंघाला छानपैकी तिंबता येईल, ही कल्पनाच धुळीला मिळाली. अशी नामी कल्पना जर मातीमोल ठरली तर डावो, पुरोगामी विचारसरणी कशी बरे रुजेल ?

यासाठीच तपशील विचारात न घेता पुढाऱ्यांनी पत्रके काढली पाहिजेत, भाषणे ठोकली पाहिजेत, व आपणही ती निष्ठेने ऐकली पाहिजेत. प्रश्न तत्त्वाचा आहे, तपशिलाचा नाही. कधी कळणार आम्हाला हे सारे ? □